आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १८ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १०२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 18 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-102 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-05


# ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देणार नाही

## वडेट्टीवार : जिसकी जितनी गिनती भारी उसकी उतनी भागीदारी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड : येथे आता पिवळे वादळ ओ आहे. आणी लाखोंच्या संख्येने जमा झालेला हा ओबीसी समुदायाची सभा ओबीसीच्या हक्काला धक्का लावतांना विचार करण्याची सभा ठरणार असल्याचे मत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अंबड येथील धाईतनगर येथे आयोजित ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभेत मांडले.**



पुढे बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, ओबीसीच्या हक्कासाठी आम्ही लढत असताना आम्हाला कोणी धमकावत असेल तर आम्ही ते कदापी सहन करणार नाही. आम्ही ज्यांना मोठ समजतो त्या मोठ्या भावाने मोठ्या भावासारखे रहावे. एकदाची ओबीसी जनगणना करावी. तुम्ही लाखोंच्या संख्येने तुमच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आला आहात. आम्ही आमच्या जीवात जीव असेपर्यंत ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. याठिकाणी आता पक्षाचा विषय नाही. जो ओबीसी की बात करेगा ओही ओबीसीकी दिलो मे रहेगा. आम्ही कोणाचे घोडे मारले तुम्ही ओबीसींची घरे जाळता हल्ले करता. तुम्हाला कोणाला काय द्यायचे ते द्या. मात्र नंदी बैल, बहुरूपी, साळी, माळी, धोबी, परीट यांचे हक्क मराठा आरक्षणाच्या माध्यमातून तुम्ही घ्यायला पाहत आहात. हे मुळीच होऊ देणार नाही आणि जर अन्याय होत असेल तर आम्ही त्या सत्तेला लाथ मारू. आता तुमच्या जमिनी कमी झाल्या असतील. पण ज्या ओबीसीकडे कधी जमीन नाही त्याचे काय. आता तरी तुमच्याकडे 10 एकर, पाच एकर जमिनी आहेत. पण माझा हा गोरगरीब ओबीसी समाज अजूनही पालात राहतो. म्हणून त्याला हे ओबीसी आरक्षण आहे. आजची अंबडची सभा तुंबळ सभा झाली. येथे आलेला हा लाखोंचा जनसमुदाय सुभेदार आणि जहागीरदारांच्या पैशावर आला नाही. स्वतःच्या स्वखर्चाने आपला हक्क वाचवायला आला आहे. आणि आता ही लढाई आपल्याला जिंकायची आहे. आपल्या हक्काचे आपण घ्यायचे आणी आपले कोणी ओढतान करून घेत असेल तर मग गल्ली बोळात आपण उभे राहायचे कोणाच्या बापाला आपण घाबरायचे नाही. आपले आरक्षण आपण वाचवायचेच, असे बोलले.

**पोलीस काय पाय घसरुन पडले का?**

छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात मराठा नेते मनोज जरांगे यांच्यावर सडकून टीका केली. उपोषण केले, काय झाले? पोलिसांचा लाठीचार्ज झाला. पोलिसांचा लाठीचार्ज सगळ्यांनी पाहिला. पण 70 पोलीस, महिला पोलीसही रुग्णावयात दाखल झाले. दगडांचा मार खाऊन जखमी झाले. काय झाले? याला उठवायला अगोदर गेले. हे म्हटले, मी जरा झोपलोय, नंतर या. पोलीस गेले. ऐका आता, गच्चीवरुन त्यांनी सगळी तयारी तोपर्यंत करुन ठेवली. महिला होत्या त्याला संबोधित करण्यासाठी तिथे महिला पोलीस आल्या. त्यांनापण आणले. जसे त्यांना निवेदन केले तेवढ्यात दगडांचा प्रचंड मारा सुरु झाला. पोलीस फटाफट जमिनीवर पडले. पोलीस काय पाय घसरुन पडले का? त्यांना कोणी मारलं? हॉस्पिटलमध्ये रेकॉर्ड आहे, असे छगन भुजबळ म्हणाले.

# केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे कांदा शेतकऱ्यांना रडवणार?

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** केंद्र सरकारचे कांदा व टॉमेटो आयात निर्यात धोरण नेहमीच शेतकरी विरोधी राहिले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांकडे जे थोडेफार कांदे शिल्लक राहिले आहेत त्याला या धोरणाचा फटका बसला असून कांदा भावात वाढ होण्याऐवजी घसरण होत आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा टोमॅटो संपुष्टात येत असल्याने त्याचे काहीसे भाव वाढले आहेत त्यामुळे टोमॅटोचे भाव वाढत असले तरी त्याचा शेतकऱ्यांना फारसा फायदा होईल असे वाटत नाही.



महाराष्ट्रातील नगदी पीक म्हणून कांदा टोमॅटोकडे पाहिले जाते. या देशाचे अर्थकारण या पिकांवर असले तरी या पिकांना केंद्र सरकारच्या आयात निर्यात धोरणाचा नेहमीच फटका बसत आला आहे. त्यामुळे कांदा व टोमॅटो उत्पादक बेजार झाले आहेत. चांगले उत्पन्न आल्यानंतर सरकारचे धोरण आणि व्यापाऱ्यांची एकाधिकारशाहीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. मुंबईतील वाशी बाजार समितीत टोमॅटोला ४५ रुपये किलो दर मिळत आहे. यामुळे किरकोळ बाजारात ६५ ते ७५ रुपये प्रतिकिलोपर्यंत टोमॅटो पोहोचला आहे. त्यामुळे टोमॅटोचे शहरी भागात दर वाढले आहेत. टोमॅटोमुळे शहरी ग्राहकांचे बजेट कोलमडणार आहे. मात्र नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांचा आढावा घेतला असता येथील बाजार समित्यांमध्ये अद्यापही टोमॅटो १० ते १५ रुपये किलो विकला जात आहे. त्यातच नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो हंगाम अंतिम टप्प्यात आहेत, त्यामुळे शहरी भागात टोमॅटोचे कितीही दर वाढले तरी टोमॅटो उत्पादकांच्या पदरात काही पडेल असे वाटत नाही.

आशिया खंडात सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा लौकिक आहे. मात्र ऑगस्ट पासून विचार केला तर ही बाजार समिती नेहमीच या ना त्या कारणाने बंद असते. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अन्य बाजार समितीचा पर्याय शोधावा लागत आहे. त्यामुळे या बाजार समितीच्या लौकिकास बाधा येत आहे. लासलगाव बाजार समिती वारंवार बंद राहत असली तरी उपबाजार विंचूर येथील कांदा बाजार सुरु आहे. त्यामुळे खरेदीत विंचूर उपबाजाराने मात्र चांगलीच आघाडी घेतलेली बघायला मिळत आहे.

यामुळे गेल्या चार महिन्यांत लासलगाव मुख्य कांदा आवारापेक्षाही विंचूरमध्ये जास्त कांदा येत आहे. या ठिकाणी लासलगावपेक्षा १ लाख १४ हजार क्विंटलने अधिक कांद्याचे लिलाव झाला आहे. विंचूर बाजार समितीच्या कांदा लिलावात ही ऐतिहासिक नोंद आहे. लासलगाव येथे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि १३ नोव्हेंबरपर्यंत कांदा व्यापाऱ्यांनी अनेक दिवस कांद्याचे लिलाव बंद ठेवले. परंतु विंचूर येथे या दिवसांत कांदा व्यापारी आणि कामगार यांनी कांदा लिलावात सातत्य ठेवले. यामुळे शेतकरी लासलगाव ऐवजी विंचूर बाजारात कांदा विक्रीसाठी आणत आहे. या बाजार समितीत ८ लाख ११ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. आता येणाऱ्या दिवसांत अधिक कांद्याचे लिलाव करुन ही आघाडी कायम ठेवली जाईल, असे लासलगाव बाजार समितीचे संचालक पंढरीनाथ थोरे यांनी सांगितले.


# जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा खात्मा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मिरमधील कुलगाम जिल्ह्यात भारतीय सुरक्षा दलाने लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेच्या पाच दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. याबाबत शुक्रवारी (१७ नोव्हेंबर) काश्मीर पोलिसांनी माहिती दिली. त्यानुसार ही कारवाई शेवटच्या टप्प्यात असून चकमक सुरू असलेल्या संपूर्ण भागाची तपासणी करण्यात आली आहे.

काश्मीर विभागीय पोलिसांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं, कारवाईच्या दुसऱ्या दिवशी कुलगाम पोलिसांनी पाच दहशतवाद्यांचा खात्मा केला. ही कारवाई आता शेवटच्या टप्प्यात आहे. या संपूर्ण भागात शोधमोहीम राबवण्यात आली आहे. याआधी पोलिसांनी सांगितलं होतं की, सीमेवर दहशतवाद्यांबरोबर मोठ्या प्रमाणात चकमक सुरू आहे. ही चकमक गुरुवारी दुपारी कुलगाम जिल्ह्यातील डीएच पोरा भागात सुरू झाली होती. या संयुक्त कारवाईत ३४ राष्ट्रीय रायफल, ९ पॅरा इलिट स्पेशल फोर्स युनिट, पोलीस आणि सीआरपीएफचा सहभाग होता. दरम्यान, १५ नोव्हेंबरला नियंत्रण रेषेवर उरी भागातही चकमक झाली होती. यानंतर ऑपरेशन काली राबवत भारतीय सैन्य आणि जम्मू काश्मीर पोलिसांनी दहशतवाद्यांचा खात्मा केला होता.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आमच्या खान्देशची माणसं मनानं एवढी मोठी की निर्जीव वस्तूनाही त्यांनी माणसांचा दर्जा दिला. पुण्यामुंबईत भलेही वस्तू ' मिळत ' आणि माणसं ' भेटत ' असतील. आमच्याकडे वस्तू सुद्धा ' भेटतात. ' मी लहान असताना चाळीसगावच्या रेल्वे स्टेशनवर गेलो की महाराष्ट्र एक्सप्रेस, पंजाब मेल या गाड्यांबद्दल लोक ज्या पद्धतीने बोलत, त्यामुळे माझं मनोरंजन होत असे. गाडी हा शब्द साधारणपणे आपण स्त्रीलिंगी वापरतो. म्हणून आम्ही म्हणायचो पंजाब मेल आली, महाराष्ट्र एक्सप्रेस आली. बाकी मंडळी मात्र त्यांना महाराष्ट्र आला, पंजाब मेल आला असं म्हणायची. गंमत म्हणजे आता ' ईमेल ' च्या जमान्यात पण ज्या पद्धतीने मेल हा शब्द वापरला जातो, त्यामुळे तो खरोखरच मेल आहे की ' फिमेल ' आहे असा प्रश्न पडावा. ' मी तुला मेल टाकली आहे. मेल भेटली का चेक कर. ' असे बोलणारे भेटतात. तर ' तुला मेल आला का ? आला असेल तर तो मला फॉरवर्ड कर ' असेही बोलणे ऐकू येते. अशा ' भाषाप्रभू ' व्यक्तींना मनापासून नमस्कार करावासा वाटतो. चहा घेतला का असं म्हणणं कॉमन आहे पण ' चहा घेतली/पिली का ' असे म्हणणारेही भेटतात. बोलीभाषेचा प्रभाव, दुसरे काय ! दर दहा कोसांवर भाषा बदलते हे अगदी खरे ! आमच्या चाळीसगावपासून अगदी जवळच असलेल्या जळगावला गेल्यावर वेगळीच भाषा आणि त्या भाषेचा वेगळाच लहेजा ऐकू येतो. आपण म्हणतो ना की मी मुंबईला गेलो होतो तर आमचा एखादा जळगावकर म्हणेल ' अरे हौ ना भो, मी बी मुंबईला गेला होता ना. ' विदर्भात वेगळी बोली आणि मराठवाड्यात वेगळी. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असणारी माणसं ' मी बिमार होतो ' असं म्हणतात. ते ' आजारी ' पडत नाहीत. एकदा संभाजीनगरला ( पूर्वीचे औरंगाबाद ) आमच्या एका नातेवाईकांनी मला बोलावलं. मी त्यांना म्हणालो की अहो, मला तिथली फारशी माहिती नाही. तेव्हा ते म्हणाले ' मी खुद ' तुम्हाला घ्यायला येईल.

## दीपावली : आनंद आणि प्रकाशपर्व





## आनंदी पहाट

## सामाजिक जबाबदारीचे भान राखणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दिवसेंदिवस आपण स्वत्वामध्ये गुंतून पडत आहोत का हो? फक्त मी आणि माझं ह्यापेक्षा काही जग नाही, ह्याच भ्रमात आपलं अंतर्मन गुरफटलेलं नाही ना? हे पाहण्याची वेळ आज आली आहे. मी आणि माझं, नाहीतर तुझं - माझं ह्यांपैकी कोणत्यातरी अनुभवाची प्रचीती आपल्यापैकी अनेकांना येतेच. ह्या मी मध्ये गुरफटल्यामुळे अहंभाव वाढत असल्याची जाणीव न होणं हीच खरं तर उणिव आहे. परस्परांमध्ये ह्यामुळे निर्माण होणारी दूरी हळूहळू दरी बनायला लागते. आपल्या व्यक्तिगत आणि खाजगी जीवनात रममाण असावंच, पण सामाजिक जबादारीचं भानही ठेवणं महत्वाचं असतं. अपघातात बळी पडलेल्या व्यक्तीला, कायदेशीर बाबींच्या कचाट्यात सापडायला लागेल ह्या संभ्रमांत राहून, दुर्लक्षित करणं ही जाणीव न होणारी उणिवच आहे. अपघातग्रस्ताच्या जागी जर दुर्दैवानं आपण स्वतः असतो तर....? हा विचारही आपल्या अंतर्मनाला स्पर्श होणं, ही जशी जाणीव आपल्याला होते, तशीच इतरांच्या जाणिवांना जपताना त्याच जाणिवेची उणिव असल्याचं दिसू लागतं. सोशल मिडियाच्या माध्यमातून आपल्या पोस्टला लाईक आणि शेअर करणारे खूप असतात, पण गरज पडल्यास केअर आणि बेअर करणारे किती जण आपल्याशी संपर्क साधतात, हे देखील विचार करण्यासारखं आहे. आज खरं तर केअर, बेअर आणि डेअर करणाऱ्यांचीच अधिक गरज आहे. केअर (काळजी करणारे, घेणारे), बेअर (समजून, सांभाळून घेणारे) आणि डेअर (हिम्मत करणारे, आपण हिम्मत करावी म्हणून साथ देणारे) करणारे तेच असतात, जे आयुष्य स्वतःचं जगतात पण विचार, वर्तन आणि व्यवहार इतरांच्या दृष्टीकोनातून करत राहतात. भ्रमांत न राहता म्हणजेच संभ्रम दूर करून जगण्यापलीकडच्या जीवनाची अनुभूती अविस्मरणीय ठरते.



आधुनिक केसरी

### मोक्षाचे कारण | संत कृपा ||

माझे हे मीपण | ऐसे सांभाळिले ||
तेणे बोलाविले | दुःख भाळी ||१||
स्वार्थाच्या बाजारी | लटका(नासका) संसार ||
झाला कर्जदार | विवेकाचा ||२||
भवसागरा ह्या | फसवी भरती ||
चक्रात फिरती | जन्मो-जन्म ||३||
संतांचे संगती | मीपण सरले ||
नैष्कर्म्य गावले | भजनात ||४||
गाथा-ज्ञानेश्वरी ||सुखाचे साधन ||
मोक्षाचे कारण | संतकृपा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

इतुकेंहि चुकोन वांचला ।तरी मारमारूं शाहाणा केला ।
लोकिकीं नेटका जाला ।नांव राखे ऐसा ॥३४॥
पुढें मायबापीं लोभास्तव ।संभ्रमें मांडिला विव्हाव ।
दाऊनियां सकळ वैभव ।नोवरी पाहिली ॥३५॥
वऱ्हाडीवैभव दाटलें ।देखोन परमसुख वाटले ।
मन हें रंगोन गेलें ।सासुरवाडीकडे ॥३६॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

सद्गुरु सत्य स्वरुप हैं, सन्त संग सत्संग ।
असत्य त्याग सत्य ग्रहण से, हँस दशा सत्
रंग ।।३५।।(पंचम मण्डल पंचम अध्याय)
०५/०५/३५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरु सत्यस्वरूप आहेत. त्या संत-सद्गुरुंचा संग सत्संग आहे. त्यांच्या संगतीने सत्य ग्रहण आणि असत्य त्याग होतो, ज्यामुळे आत्मा सदैव सत्य धर्मात स्थित राहातो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास




आसेतुहिमाचल मठमहंत निर्माण करून, निःस्पृह नेतृत्व समाजात निर्माण करून त्यांनी राष्ट्र उभारणीच्या कार्याला पूरक असे कार्य साधले. धर्मसत्ता व राजसत्ता यांचा अपूर्व समन्वय साधून सशक्त तरुणांची मने राष्ट्रवादाने भारून टाकली. प्रभु श्रीरामचंद्र, आदिशक्ति तुळजाभवानी आणि शक्ती उपासनेसाठी मारुतीराया या तीन देवतांचा जागर त्यांनी समाजात मांडला. अक्षरशः शेकडो मारुती मंदिरांची स्थापना त्यांनी केली. स्वतः डोंगरदऱ्यांत, घळीत राहून समाजाचे व देशाच्या कल्याणाचेच चिंतन केले. समाजातील प्रत्येक घटकाला, अनेक अनाथ, निराधार बालकांना, स्त्रियांना सन्मार्गाचा, आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला. समर्थावर संत एकनाथाच्या वाङ्मयाचा प्रभाव असल्याने प्रपंच आणि परमार्थ नेटका करण्यासाठी विवेकसंपन्न व्हा, असा उपदेश केला.

## संतांना कसे ओळखावे ?

आधुनिक केसरी

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का ? नाही; तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.
जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे; आणि आपण लगेच देवाला शरण जाऊन, 'हे माझे दुर्गुण काढून टाक', म्हणून



त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा 'जगात न्याय उरला नाही' असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वतःला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे, आणि 'माझे चित्त शुद्ध कर' अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते, आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही. जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंतःकरण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंतःकरणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंतःकरणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. 'माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,' ही वृत्ती आपण ठेवावी.

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

तिर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी. प्रपंच व परमार्थ,द्रुष्य,विश्व, आणि परमात्म वस्तु यामधे थोडासा देखील भेद नाही.कारण स्वानंद आत्मा हा विश्वरूपानेआकाराला आलेला आहे.तुप गरम केले तर ते पातळ होते. तुप हे तुमचं रहाते त्यात काही फरक पडत नाही त्याचं प्रमाणे मूळ निर्गुण परमात्मवस्तु सगुण होऊन आकारास आली,तरी तिच्यात फरक पडत नाही,तिथे द्रष्टेपणाने वेगळे काय करता येणार/काहीच करता येणार नाही. द्रष्टा व द्रुष्य एकचं आहेत म्हणजेच परमात्मा एकचं आहे.तुप पातळ असलं काय किंवा घट्ट असले काय तुप हे जसे तुपच असते. सारांश काय की द्रुष्य म्हणजे विश्व व आकारास आलेले परब्रम्हाच होय.
ईथे मी परत तुपाचेच उदा , देते एक जण दिलेल्या घट्ट झालेल्या तुपालाच तुप मानतो तर दुसरा गरम करून वितळलेल्या तुपाला तुप म्हणतो. एक साक्षी पणाने पहातो,तर दुसरा वेगळे पणाने पहातो. खरं तर त्यांचे अज्ञान हेच आहे की द्रष्टा व द्रुष्य दोन्ही एकचं परमात्म वस्तू आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १८ नोव्हेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# लोकांचे खाल्ल्याने ते आतमध्ये जाऊन आले

## जरांगे पाटील : भुजबळांचं वय झालं, पण आम्ही देखील कच्चे नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** छगन भुजबळ यांनी केलेल्या टीकेला मनोज जरांगे यांनी प्रतिउत्तर दिले आहे. मराठा समाजाने आता ठरवले आहे, आम्ही त्यांच्या टीकेला उत्तर देणार नाही. त्यांना तेच काम उरले आहे. लोकांचे खाल्ल्याने ते आतमध्ये जाऊन आले आहेत. कोण कुणाचे खात आहे सर्वांना माहित आहे. त्यामुळे त्यांनी यावर बोलू नाहीत. तुम्ही टीका केली तर, तुम्हाला उत्तर देण्यासाठी आम्ही कच्चे नाहीत. या राज्यात आम्ही वातावरण खराब होऊ देणार नाही. आता आम्ही देखील 50 टक्के आहे. लोकांचे पैसे खाता, रक्त पिता का? मग तुम्हाला कोण देव मानणार आहे. वयाने तुम्ही मोठे आहेत. आम्हाला काढायला लावू नयेत. आम्ही देखील तुमचा बायोडेटा काढला आहे. धमक्या देऊ नयेत, असे जरांगे म्हणाले.



टीका करण्याचं कामच त्यांना आहे. त्यामुळे त्यांना महत्त्व द्यायचं नाही असं आम्ही ठरवलं आहे. त्यामुळे यापुढे त्यांना महत्त्व देणार नाही.

**विजय वडेट्टीवार यांच्या टीकेला उत्तर ...**
भुजबळांना निवडणुकीत पाडा असं मी कधीच म्हटलं नाही. आमच्या मराठ्याच्या नेत्यांना तुम्हाला पाडणे शक्यच नाही. आमचे नेते खूप नमुनेबाज असल्याचे जरांगे म्हणाले. तर, विजय वडेट्टीवार यांच्या टीकेला उत्तर देतांना जरांगे म्हणाले की. "तुम्ही खाता किती. आम्ही तुमच्या लेकरांबद्दल कधी वाईट बोललो नाही. बकरे वगैरे म्हणून दुसऱ्यांच्या मुलांना वाईट बोलू नका. आम्ही तुमच्या लेकरांचं बकरे म्हणून कधी उल्लेख केला नाही. पण असे बोलून तुम्ही मुलांचं अपमान करत आहात. यांचा तोल गेला असेल, असा टोला जरांगे यांनी लगावला आहे.

**भुजबळांची हकालपट्टी करा, संभाजीराजेंची मागणी**
छगन भुजबळ हे राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य ओबीसी बांधवांचा मराठा समाजास कोणताही विरोध नसताना केवळ आपले राजकीय स्थान टिकवण्यासाठी दोन समाजांत नसलेली भांडणं लावण्याचं पाप करत आहेत. सरकारमधील एक मंत्री उघडपणे वेगळी भूमिका घेऊन जातीय तेढ निर्माण करत असेल तर सरकारची देखील हीच भूमिका आहे का? हे स्पष्ट करावे अन्यथा छगन भुजबळ यांची मंत्री पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

राहुल गांधींनी विजय वेडट्टीवार यांना विरोधी पक्षनेता मराठ्यांच्या मुलांचं वाटोळं करण्यासाठी दिले आहे. त्यामुळे त्याप्रमाणे ते बोलत असतील. तर, पंकजा मुंडे यांना गोरगरिबांची जाण आहे. गोपीनाथ मुंडे यांनी गोरगरिबांचे कल्याण करण्यासाठी काम केलं आहे. त्यामुळे त्या या सभेला आल्या नसतील असेही जरांगे म्हणाले.

**भुजबळांनी जरांगेंना राजकीय आव्हान देण्याची गरज काय होती? :** वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यात दोन समाजात दंगली घडवण्याचा काहींचा प्रयत्न आहे. पण आम्ही हे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी जिल्ह्याजिल्ह्यात बैठका घेऊ. अंबडच्या आजच्या सभेत भुजबळांना जरांगेंना राजकीय आव्हान देण्याची गरज काय होती? आरक्षणावरून भांडून काय साध्य होणार? आपल्याला एकत्र राज्यातच रहायचं आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायद्याच्या चौकटीत सुटू शकतो. जरांगेंचा बोलविता धनी कोण विचारणाऱ्या राज ठाकरेंचा बोलविता धनी कोण? असा प्रश्न प्रकाश आंबेडकरांनी विचारला आहे.

# श्रीक्षेत्र सिद्धेश्वर मंदिर जुना लोहा ते श्रीक्षेत्र कपिलधार पदयात्रा रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील श्रीक्षेत्र सिध्देश्वर मंदिर जुना लोहा ते श्रीक्षेत्र कपिलधार पदयात्रा रवाना झाली असून या भव्य पदयात्रेचे लोहा शहरात ठिकठिकाणी जोरदारपणे स्वागत करण्यात आले आहे. लोहा शहरातून दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री मन्मथ स्वामी यांच्या श्रीक्षेत्र कपिलधार जिल्हा बीड येथील यात्रेस लोहा शहरातील भाविक भक्त मोठ्या उत्साहात भव्य पदयात्रा दिंडी सोहळा द्वारे निघते यंदा यंदा या पदयात्रा दिंडी सोहळ्याचे सलग ९ वे वर्ष आहे.

यंदा ही लोहा शहरातील श्रीक्षेत्र सिध्देश्वर मंदिर जुना लोहा ते श्रीक्षेत्र कपिलधार पदयात्रा दिंडी दि. १७ रोजी रवाना झाली असून सदरील पदयात्रा दिंडी ही दि. २६-११-२०२३ रोजी कपिलधार येथे पोहचेल. तीर्थयात्रा पायीघडो!परोपकारी देह पडो , जाती कुळ गोत्र न पाहे शंकर! भक्ताचे माहेर स्वामी माझा हा नारा देत श्री श्री १०८ सद्गुरू डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महाराजांच्या कृपा आशिर्वादाने व श्री श्री शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रेरणेने लोहा शहरातून श्रीक्षेत्र कपिलधार कडे पदयात्रा दिंडी सोहळा रवाना झाली या दिंडीचे लोहा शहरात माजी आमदार रोहिदास चव्हाण, नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते दताभाऊ वसमतकर, जेष्ठ साहित्यिक शेषेराव कहाळेकर, बुलढाणा अर्बन बँकेचे मॅनेजर केशवराव शेटे, मलकू अप्पा शेटे, संजय कहाळेकर, कैलास कहाळेकर, युवराज वाघमारे, स्वप्नील शेटे, पिंटू वडे, नागु शेटे , गजानन शेटे, प्रकाश कहाळेकर, यांच्या सह लोहा शहर व परिसरातील भाविक भक्तांनी जोरदारपणे स्वागत केले.



# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची नियोजन बैठक

## सुषमा अंधारे यांच्या सभेचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या महप्रबोधन यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यातील सभा वाशिम तेथे होणार आहे. त्या अनुषंगाने सदर सभेचे नियोजन करण्यासबंधी जिल्हयातील प्रत्येक तालुका स्तरावरआढावा बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. आज १७ नोव्हेंबरला रिसोड येथील विश्वा लॉनच्या सभागृहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली.

नोव्हेंबरला सायंकाळी 5 वाजून 30 मिनिटांनी कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगोली रोड वाशिम इथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांची महाप्रबोधन यात्रा टप्पा दोन ची सभा होणार असून सभेला शिवसेना संघटक उद्धव कदम वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप जाधव उपस्थित राहणार आहेत त्या अनुषंगाने माजी राज्यमंत्री संजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची नियोजन बैठक दिनांक 17 नोव्हेंबरला दुपारी 01:00 वाजता रिसोड येथील विश्व लोन हॉलमध्ये आयोजित केली होती. बैठकीला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता सुरुवातीला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिमेचे पूजन करून बैठकीला सुरुवात करण्यात आली बैठकीला मार्गदर्शन म्हणून माजी मंत्री संजय राव देशमुख होते त्यांच्यासमवेत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर जिल्हा संघटक गजानन देशमुख कॅप्टन प्रशांत सुर्वे रिसोड विधानसभा प्रमुख अशोक अंभोरे उपजिल्हाप्रमुख डॉ चंद्रशेखर देशमुख विधानसभा संघटक सुभाष बोरकर रिसोड तालुकाप्रमुख नारायण आरू तालुका संघटक आनंद कुलाल तालुका समन्वय घनश्याम मापारी युवासेना तालुकाप्रमुख गजानन सानप युवासेना उपजिल्हाप्रमुख गणेश देशमुख रिसोड शहर प्रमुख संजय इरतकर रिसोड युवासेना शहरप्रमुख कैलास ठोकरे उपतालुकाप्रमुख प्रकाश चोपडे गजानन खोडके किसन कुलाल शिवाजी वाघ गंगाधर आरू हरिभाऊ ढंगारे लक्ष्मण लामने लक्ष्मण जावळे उद्धव बोरकर रतन बोरकर सोपान आंबोरे पवन सदर दीपक मापारी सदाशिव तिखे संजय तिखे कैलास इप्पर परमेश्वर गव्हाणे रामभाऊ नरवाडे शेषराव मोरे संतोष जाधव भगवान सरनाईक संजय गरकळ संतोष सपकाळ खंडू वानखेडे परमेश्वर गव्हाणे शिवाजी सोनुने नंदू घुगे गुलाबराव सरनाईक यांच्यासह रिसोड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## जिनपिंग यांना कोपरखळी

आधुनिक केसरी

अमेरिका आणि चीन यांच्यातले सख्य आणि पराकोटीची स्पर्धा सर्वश्रुत आहे. अमेरिका जागतिक महासत्ता असून चीनला अमेरिकेच्याही पुढे जाण्याची इच्छा आहे. त्यामुळे चीन व अमेरिका यांच्यातील उघड पण अघोषित स्पर्धा व त्याचा द्विपक्षीय संबंधांवर होणारा परिणाम या गोष्टी नेहमीच चर्चेत असतात. पण आता जागतिक महासत्ता होण्यातली दोन्ही राष्ट्रांमधली स्पर्धा दोन्ही राष्ट्रप्रमुखांच्या मिश्किल संवादातूनही समोर येऊ लागली आहे! याला निमित्त होते या दोघांच्या नुकत्याच झालेल्या भेटीचे!

गेल्या अनेक महिन्यांपासून जो बायडेन व शी जिनपिंग यांच्या भेटीची जागतिक स्तरावर जोरदार चर्चा दिसून आली. जागतिक स्तरावरील अनेक महत्त्वाच्या व गंभीर मुद्द्यांवर दोन्ही राष्ट्रप्रमुखांमध्ये चर्चा होणे अपेक्षित होते. दिल्लीत झालेल्या जी-२० परिषदेला शी जिनपिंग गैरहजर राहिल्यामुळे ही चर्चा होऊ शकली नाही. त्या पार्श्वभूमीवर कॅलिफोर्नियामध्ये झालेली ही भेट महत्त्वपूर्ण ठरली. मात्र, भेटीदरम्यान झालेल्या चर्चेचे मुद्दे जरी बाहेर येऊ शकले नसले, तरी बैठकीनंतर त्यांच्या कारबाबत दोघांमध्ये झालेल्या मिश्किल चर्चेचा व्हिडीओ मात्र व्हायरल होऊ लागला आहे. अमेरिकेच्या दौऱ्यावर असणाऱ्या शी जिनपिंग यांनी कॅलिफोर्नियात जो बायडेन यांची भेट घेतली. या भेटीनंतर जो बायडेन स्वत: शी जिनपिंग यांना सोडण्यासाठी त्यांच्या कारपर्यंत आले. जिनपिंग यांची कार पाहाताच बायडेन यांनी ही खूप सुंदर कार आहे, असे म्हणत कौतुक केले. त्यावर शी जिनपिंग यांनी लागलीच चायनिज भाषेत ही माझी रेड फ्लॅग कार आहे, असे सांगितले. दुभाषकाने त्याचं भाषांतर करू सांगितल्यानंतर बायडेन यांनी त्यावर स्मितहास्य केले. पुढे जिनपिंग कारमध्ये बसण्याआधी जो बायडेन यांनी त्यांना त्यांच्या कारबद्दल सांगितले. तुम्हाला माहितीये ते माझ्या कारला काय म्हणतात? द बीस्ट. पुन्हा दुभाषक महिलेने याचं भाषांतर शी जिनपिंग यांना करून सांगताच त्यांनीही हसून त्याला दाद दिली. या प्रसंगाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायकरल होत असून दोन्ही देशांमधील स्पर्धेच्या चर्चेप्रमाणेच त्यांच्या राष्ट्रप्रमुखांच्या कार्सचीही आता चर्चा होऊ लागली आहे!



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

## राजकीय अंजेड्यात अडकला धर्म

आधुनिक केसरी

**भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतीय संविधाना नुसार देशाचे प्रशासन चालले तर देश व देशातील जनता जगाचे नेतृत्व केल्या शिवाय राहणार नाहीत. संविधानाच्या रुपाने भारताकडे जगातील सर्वात मोठी अशी ताकत आहे की प्रत्येकाने संविधाना नुसार वागायचे ठरवले तर अर्ध्या पेक्षा जास्त समस्या विचार करतानाच संपतात आणि संविधाना नुसार एक महिना प्रशासन चालवले तर भारत जगात समृद्ध देश झाल्या शिवाय राहणार नाही.**

परंतु भारतीय संविधानानुसार काम का केले जात नाही या मागे हजारो वर्षाचे शोषण, पिळवणूक, विषमता, जातीवाद अस्पृश्यता व सर्वात महत्वाची माणसाला माणुन म्हणून न स्विकारण्याची माणसिकता दडलेली आहे. संविधानाने हजारो वर्षापासून चालत आलेले लिखित अलिखित नियम बाजूला सारून जातीप्रधान देशामध्ये हजारो जातीच्या लोकांना भारतीय ओळख दिली, स्त्रि पुरुष कोणत्याही प्रकारचा भेद न करता समान संधी, समान अधिकार देऊन समान मानसन्मान व समान किंमत दिली. हिच गोष्ट आजही काही लोकांच्या जिव्हारी लागते म्हणून ते लोक संविधानाबद्दल अपप्रचार करतात व संविधानाने दिलेले समान हक्क-अधिकार, समता, बंधुता, न्याय ह्या गोष्टी ज्यांना मान्य नाहीत ते लोक आजही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत आहेत. व पुन्हा संविधानाने दिलेले हक्क अधिकार, समता, बंधुता न्याय व शिक्षण हिसकावून घेऊन पुन्हा धार्मिक गुलामगिरी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या संविधान विरोधी शक्ती कडून सुरु आहे. संविधानीक स्वायत्त संस्थाना राजकीय आपल्या हातचे बाहुले बनवून त्याचा वापर सरकारच्या मर्जी ने करून घेतला जात आहे. स्वायत्त संस्थेतील कर्मचारी व अधिकारी यांना योग्य पद्धतीने काम करू दिले जात नाही आणि कर्मचारी अधिकारी राजकीय दबावाखाली का येतात? राजकीय षडयंत्रात अडकून स्वायत्त संस्थेतील कर्मचारी अधिकारी आपले इमान राजकीय पक्षाच्या दावनीला का बांधले जाते हा स्वतंत्र विषय होऊ शकतो. पण राजकारण हे कामाच्या, लोकविकासाच्या आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई, कृषी विकास, लघु व कुटीर उद्योग या मध्ये केलेल्या कामावर करणे गरजेचे असते. खरं तर प्रत्येक राजकीय पक्षाला भारतीय संविधान आणि जनकल्याण याला धरून कोणत्याही प्रकारची जातीय, धार्मिक तेढ वा विषमता प्रस्थापित न होता धर्म, जात निरपेक्ष निवडणूक अजेंडा तयार करणे आवश्यक असते. परंतु लोकांचे कल्याण हे शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई वर नियंत्रण, कृषी विकास व कृषी मालाला भाव यावर अवलंबून असते. परंतु गेल्या काही वर्षापासून शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा व्यापार केला. शासकीय शिक्षण संस्था बंद पाडून खाजगी शिक्षण संस्था ना महत्त्व देऊन गोरगरीब लोकांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दुर ठेवण्याचा पुन्हा प्रयत्न केला जात आहे. सार्वजनिक संपती खाजगी लोकांना विकुन तेथील लाखों करोडोचे रोजगार कमी केले. सार्वजनिक संपत्ती विकल्याने त्यातून आलेला पैसा आणि शासकीय नोकरी कमी केल्याने पगाराचा बचत झालेला पैसा तसेच प्रत्येक गोष्टी वर वाढलेला अनियंत्रित कर यातून आलेला पैसा सरकार नेमका खर्च करते तरी कुठे हे एक भयानक रहस्य आहे. आणि सदुसष्ट वर्षात जेवढे कर्ज काढले नाही त्यापेक्षा जास्त कर्ज काढून सरकारने देशाला भिकेला लावले. हा एवढा पैसा नेमका खर्च कुठे झाला? हा विषय खुप गंभीर आहे. परंतु यावर कोणीच बोलायला तयार नाही. प्रत्येकाला आपापला वाटा मिळाल्याने सर्वजन गप्प बसले आहेत परंतु यामुळे देश कंगाल राजकीय नेते व उद्योगपती मालामाल आणि जनता मात्र बेहाल झाली आहे. जनतेच्या प्रश्नांवर लक्ष द्यायला कोणी नाही, उपासमार, कुपोषण, शेतकरी स्वहत्या, शिक्षणाचा घसरता दर्जा, शिक्षण घेऊन बेरोजगार तरुणांची संख्या, महिला प्रश्न, असे असंख्य प्रश्न व समस्या असताना ह्या समस्येवर लोकांचे लक्ष जाऊ नाही म्हणून सतत लोकांना धर्म जातीचा आधार घेऊन भावनिक करून भटकवले जाते. लोक जाती धर्माच्या नावावर भडकतात, वाद पेटतो जे बेरोजगार आहेत त्यांचा वापर या कामासाठी करून बेरोजगार तरुणांना काम देण्याऐवजी भडकलेल्या तरुणांकडून काही अनुचित प्रकार घडला की त्याच्या वर गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उद्ध्वस्त केले जाते. बर सत्ताधारी लोकांनी असे करत असताना स्वतःला विरोधी पक्ष माणणारे पण प्रत्यक्षात विरोधी पक्ष नसलेले लोक ही स्वतः च्या जाती धर्मातील तरुणांवर गुन्हे दाखल होताना गप्प बसतात. यातून राजकारणाची पातळी किती घसरली हे लक्षात येते. राजकारण हे लोकांच्या विकासाचे महत्वपूर्ण माध्यम आहे परंतु या लोकांनी याचा चुकीचा वापर करून एवढे मलिन केले की आज सर्वसामान्य लोकांच्या मनात राजकीय नेते व राजकीय पक्ष यांच्या बद्दल आदर आपुलकी राहलेली दिसत नाही. काही भक्त लोक असतात तो भाग सोडला तर अनेक नेत्याच्या, सत्ताधारी पक्षातील मोठ्या नेत्याच्या पैसा, सत्ता व इतर बळाचा वापर करूनही सभा अयशस्वी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. कारण लोकांना आज थोडफार का होईना पण कळत आहे. राजकीय नेत्यांची व पक्षाची बदमाशी लक्षात येत आहे. जनते मध्ये थोडीफार का होईना जागृतता निर्माण होत आहे परंतु राजकीय पक्ष व राजकीय नेते आजही जनतेला धर्माच्या व जातीच्या व देवाच्या नावावर भावनिक बनवण्याचे काम करून मताचे भिक मागताना दिसत आहेत. राजकीय सभेला धार्मिक स्वरूप देऊन राजकीय सभेमध्ये वेगवेगळ्या देवाचे नाव घेऊन लोकांकडे मतासाठी हात पसरावे लागत असतील तर त्यांनी आपल्या कारकिर्दीत किती कामे केले याची कल्पना येईल. लोकांसाठी केलेल्या कामाची उजळणी करण्याऐवजी जर धर्माचा आधार घेऊन, देवाचा आधार घेऊन भावनिक केले जात असेल तर सत्तेच्या नावाखाली यांनी जनतेला किती लुटले असेल? खोटं बोलुन जनतेची दिशाभूल करणे हा राजकीय लोकांचा धंदा च होऊन बसला पण आता भावनिक बनवून देवाच्या नावाचे नाव घेऊन देवाच्या नावाचाही यांनी बाजार लावला. कर्मा ऐवजी धर्माला महत्त्व देणारे काही महाभाग या षडयंत्रात फसतात देखील तो भाग वेगळा आहे. विकासाच्या, शिक्षणाच्या नावावर लोकांसमोर मत माघण्या ऐवजी हनुमान, रामाचा आधार घेतला जात असेल तर तुम्ही कोणकोणती कामे केले हे कोण सांगणार? तरुणांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई वर नियंत्रण यावर निवडणूक अजेंडा असायला पाहिजे परंतु हे बाजूला सारून याबद्दल एकही शब्द न बोलता, आणि स्वतःच्या भाषणात नवीन एम्स, आयायटी, आय आय एम बांधल्याचे दावे करून प्रधानमंत्री यांनी मनाचा मोठेपणा दाखवून एकाही एम्स, आय आय टी, आय आय एम व इतर विद्यापिठाचे उद्घाटन न केल्याने जनताच त्यांनी केलेले काम शोधत आहेत. कारण रेल्वे ला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी मोदी साहेब हजर राहतात तर देशात एम्स, आय आय टी , आय आय एम, इतर विद्यापीठ दर महिन्याला ओपण होत असताना मोदी साहेब उद्घाटन का करत नसतील हा खुप सखोल संशोधनाचा विषय आहे. म्हणून केवळ बोलुन काहीच होत नाही. शासकीय संरक्षणात राहून माणूस काहीही फेकु शकते म्हणून पत्रकार परिषद घेतल्या जात नाही. एकंदरीत आपल्या कामाचा लेखाजोखा जनतेने माघु नये आणि मतासाठी जनतेसमोर हात तर पसरायचे तर सध्या खुप मोठा आणि क्रांतीकारी निर्माण सत्ताधारी पक्ष घेत असुन आपल्या प्रचार सभेमध्ये मांडत आहेत. तो निर्णय व आश्वासन असे आहे की ते शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी यावर काम करो कि न करो. परंतु रामाचे दर्शन करण्यासाठी ते जाण्या येण्याची मोफत सुविधा करून देतील. एवढा क्रांतीकारी निर्णय घेऊन देशाची अर्थव्यवस्था बहुतेक एक नंबर वर येईल असे वाटते आणि लोक टाळ्या वाजवतात. मिडिया वाले प्रश्न विचारत नाहीत तेव्हा सर्वांची किव येते. रोजगाराचा दावा करणारे सरकार हे मान्य करते की आपण कोणते ही काम केले नाही. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. लोकांची खायची सोय नाही तर लोक बाहेर कसे जाणार. राम मंदिराला भेट देण्यासाठी लोकांकडे पैसा नाही एवढे कंगाल आपण त्यांना बनवले आहे हे त्यांच्या च भाषणातून सिद्ध करतात म्हणून आलटून पालटून सर्वांचा राम मंदीराला भेट देण्यासाठी सर्वांचा खर्च सरकार करेल म्हणजे केवढे मोठे आंतरराष्ट्रीय काम हे सरकार करणार असेल विचार करा. सर्वांच्या शिक्षणाची फि सरकार भरेल, सर्वाच्या दवाखाण्याचा खर्च सरकार भरेल, सर्वांच्या हाताला काम सरकार देईल, नोकरी सरकार देईल. नोकरी तुन पैसा मिळाला की समुद्धी होईल आणि मग अयोध्या च काय अमेरिका पण फिरून या आणि तेही तुमच्या कष्टाच्या पैशावर असे आश्वासन का देत नसतील ? कारण त्यांना माहिती आहे लोक जागृत होत आहेत. शिक्षण, नोकरी, याविषयी आश्वासन दिले तर लोकांना पटणार नाही. आणि सर्वात महत्वाची गोष्ट ज्या देशात देशांतर्गत एक वेळ फिरण्याचा खर्च उचलण्याची जबाबदारी जर सरकार ला घ्यावी लागत असेल तो देश आर्थिक दृष्टीने किती कमकुवत असेल याची कल्पना ही करू शकत नाही. म्हणून राजकीय अजंड्यात धर्माला आणुन पुन्हा लोकांना भावनिक व मुर्ख बनवले जात आहे. लोकांना सर्व समस्येमधुन बाहेर यायचे असेल तर सर्वांनी मिळून ईव्हीएम ला विरोध केला तर सर्वजण जनकल्याणाचे काम हाती घेतील. म्हणून राजकीय नेत्यांचे मानसिक खच्चीकरण करायचे तर ईव्हीएम बंद करून बँलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा आग्रह धरला तर राजकीय अजेंडा मधुन धर्माचा आधार बाजूला जाऊन कामाचा अजेंडा तयार होईल व येणाऱ्या पिढीसाठी नोकरी, शिक्षण, आरोग्य सुविधेचा आशेचा किरण दिसेल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## मुलांच्या सुप्त गुणांना गती देणं पालकांचं कौशल्य

आधुनिक केसरी

**आपली मुलं यशस्वी व्हावीत अस प्रत्येक पालकाला वाटत असत. त्याच बरोबर पालकांच्या मनात मुलांच्या भविष्याची चिंता देखिल असते हि चिंता अधुन मधून प्रकट पण होत असते .पण फक्त चिंता करून काही उपयोग होईल का आपली चिंता व्यर्थ जाणार नाही यासाठी योग्य वेळी मुलांच्या मनातील दिशा ओळखायला आली पाहिजे. कारण चिंता हि व्यर्थ आहे निरूपयोगी आहे. चिंता करण्या ऐवजी योग्य वेळी मुलांच्या मध्ये असणारे योग्य गुण ओळखून त्या गुणांना वाव शक्ति प्रदान करण हे पालकांच योग्य कर्तव्य आणि जबाबदारी आहे. प्रत्येक पालकांच्या मनात एकच इच्छा असते कि काही हि झालं तरी आपल्या मुलांच भविष्यातील जीवन हे सुखकर झाले पाहिजे.**

पण यासाठी मुलांच्या मनाचा वेध घेऊन त्याच्या कार्य शक्तीला योग्य गती कशी आणि किती प्रमाणात द्यावी हे खूप महत्त्वाचे आहे. अयोग्य वेळी दिलेली प्रचंड गती हि निरुपयोगी ठरते आणि योग्य वेळी योग्य गती दिली तर ती उपयोगी ठरते. म्हणून आपल्याला पाल्याचे भविष्य घडविण्यासाठी भविष्य सुरक्षित करण्यासाठी आपण पालक म्हणून त्या मध्ये असणारे सुप्त गुण योग्य वेळी ओळखून योग्य गुणांना वाव देत गती दिली पाहिजे. जेणेकरून मुलांच्या मध्ये असणारे योग्य गुण योग्य पद्धतीने योग्य वेळी विकासीत होऊन विराट रूप धारण करून आपल्याला सार्थक परिणाम मिळतील. मुलांच्या मध्ये प्रचंड शक्ति ऊर्जा असते.पण आपण ती उर्जा योग्य दिशेने योग्य वेळी प्रवर्तित नाही केली तर मग मात्र हिच शक्ति चुकीच्या दिशेने मार्गक्रमण करते मग शेवटी त्याचे चुकीचे परिणाम देखिल आपल्याला पाह्यला मिळतात आणि नंतर आपण पश्चात्ताप करतो. पण त्याला फारसा अर्थ उरत नाही. म्हणूनच मुलांच्या मध्ये योग्य वेळी सात्विक गुण अणि सकारात्मक विचार पेरणी करून यशचा गुरूमंत्र प्रदान करून सातत्याने पाठपुरावा करात असताना योग्य पद्धतीने मुलांशी संवाद देखील गरजेचा आहे. मुलांमध्ये असणारी सुप्त शक्ती हि पालकाला योग्य वेळी ओळताच आली पाहिजे.व ओळखून त्याला योग्य गती प्रदान करून त्याच यशात रुपांतर करण्याची खरी जबाबदारी हि पालकांची असते. बालवयात मुलं हि निरागस आणि अनुकरणशिल असतात. त्यांना चांगलं काय , वाईट काय, योग्य काय, अयोग्य काय, याच फार गांभीर्या नसतं. म्हणजे जसं वातावरण लाभेल, संगत सहवास



जसा असेल किंवा ज्या विचारांचा प्रभाव होईल तसंच मुलं घडतात. मग पालक म्हणून आपली हि जबाबदारी आहे कि आपल्या मुला मध्ये जे सुप्त गुण आहेत त्या सुप्त गुणांना योग्य वेळी ओळखून योग्य दिशा देता आली पाहिजे तरचं मुलांचं आयुष्य आणि भविष्य सुखकर सुरक्षित होईल. प्रत्येक व्यक्ती मध्ये कोणत्या तरी एक प्रकारची प्रतिभा दडलेली असते आणि आपण पालक म्हणून मुलांचं योग्य भविष्य घडविण्यासाठी आपल्या मुलां मध्ये असणारी योग्य गुणात्मक शक्ति योग्य वेळी ओळखुन ती गतीमान करता आली पाहिजे. जेणेकरून मुलां मध्ये असणारी प्रतिभा अगदी विस्तृत रूप धारण करेल आणि ते दैदिप्यमान यशोशिखरावर पोहचतील .या मध्ये तीळमात्र शंका नाही. बाल वयात जे काही योग्य अयोग्य संस्कार,कुसंस्कार मुलांवर घडतील त्याच मार्गाने मुलं पुढे मार्गक्रमण करतात त्या क्षेत्रात आपली उंची निर्माण करतात मग ते क्षेत्र कोणतही असेल, बाल मन वय बुद्धी हि कोमल असते.संवेदनशील असते. बालवयातच जिज्ञासा वृद्धिंगत होत असते मग हि जिज्ञासा कोणत्याही क्षेत्रातील असु शकते. म्हणून पालक म्हणून आपली जबाबदारी आहे कर्तव्य आहे कि आपल्या पाल्या मध्ये असणारे विशेष गुण प्राविण्य यांचं निरीक्षण करून सकारात्मक दिशादर्शक गुण वाढीस लागतील या दृष्टिकोनातून प्रयत्न करून योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या मध्ये असणारी शक्ति सकारात्मक कार्यासाठी वृद्धिंगत होईल यासाठी योग्य मार्गदर्शन योग्य काळजी आणि जबाबदारी हेच उत्कृष्ट आणि आदर्श पालकांचे कर्तव्य आहे मुलांच भविष्य सुरक्षित करण्यासाठी घडविण्यासाठी पालकांनी योग्य वेळी मुलां मध्ये असणारी गुण वैशिष्ट्य कौशल्य ओळखून त्या गुणांना योग्य वाव व सकारात्मक गती प्रदान केलीच पाहिजे जेणेकरून मुलं नक्कीच यशोशिखरावर गठतील या मध्ये शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कुत्रा चावल्यास ग्राम पंचायतीने भरपाई द्यावी

## माजी सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात मोठ्या प्रमाणात भटकंती कुत्रांची वाढ झाली आहे. ग्राम पंचायतीच्या व्याप्तीमध्ये सावळदबारा परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे ग्रामीण भागातही भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर आला असून नसबंदी करण्यासाठी तालुकास्तरीय समितीची रचना करून कुत्र्यांच्या पैदाशीवर नियंत्रण ठेवण्याची सूचना करण्यात आली आहे. तर कुत्रा चावल्यास उपचार खर्च व कुत्रा चावून एखादी व्यक्ती मरण पावल्यास त्याची भरपाई ग्राम पंचायतीने यावी लागणार आहे, असा आदेश पंचायतराज खात्याकडून जिल्हा पंचायतीला बजावण्यात आला आहे.



आता शहरासह ग्रामीण भागामध्येही भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे नगरपालिका व काही गावातील च्या व्याप्तीमध्ये भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात येत आहे. यासाठी निविदा मागवून बंदोबस्त केला जात आहे. मात्र ग्रामीण भागामध्ये ग्राम पंचायतीच्या व्याप्तीत भटक्या कुत्रयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने लहान मुले,नागरिकांना,व सावळदबारा चक्रधर स्वामींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पंचायतराज खात्याकडून मार्गसूची जारी करण्यात आली आहे.अशी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे.तालुकास्तरीय समितीची रचना करून प्रशासकीय व आर्थिक जबाबदारी स्वीकारून याची अंमलबजावणी करण्याची सूचना करण्यात आली आहे. गावातील व्याप्तीमध्ये राबविण्यात येणाऱ्या नसबंदी मोहिमेप्रमाणेच ग्राम पंचायत तालुका पंचायतीकडून अशाप्रकारे मोहीम राबविण्यासाठी कार्यवाही करण्याची सूचना करण्यात आली आहे. भटक्या कुत्र्यांकडून हल्ला करण्यात आल्यानंतर जखमींना उपचार खर्च, भरपाई तसेच मृत झाल्यास मरणोत्तर भरपाई देण्याची तरतूद या आदेशात करण्यात आली आहे.प्रत्येक तालुका पंचायत कार्यालयात मटकी कुत्री नियंत्रण केंद्र निर्माण करावे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीची व्यवस्था उपलब्ध करून ठेवण्यात यावी, ग्राम पंचायतीनी आपल्या व्याप्तीतील भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यासाठी शुल्क भरून तालुकास्तरीय केंद्राची मदत घ्यावी. प्रत्येक तालुक्यातील भटक्या कुत्र्यांची गणती पशुसंगोपन खात्याच्या माध्यमातून करण्यात यावी भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घ्यावी, अशी सूचना या आदेशातून करण्यात आली आहे.अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

# जागतिक मूळव्याध दिनानिमित्त मोफत मूळव्याध, भगंदर, फिशर तपासणी आणि उपचार शिबीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय येथे दि. १८ ते २० नोव्हेंबर रोजी जागतिक मुळव्याध दिनानिमित्त सकाळी १० ते दुपारी ०१ या वेळेत मूळव्याध, भगंदर, फिशर या सारख्या गुदविकारावरील आजारांसाठी मार्गदर्शन, मोफत तपासणी आणि उपचार शिबीराचे आयोजन केले आहे. मुळव्याध हा रूग्णाला बेजार करणारा एक आजार आहे. कारण याची लक्षणे सुरूवातीला जाणवत नाहीत. शिवाय अवघड जागेवर असलेल्या मुळव्याधीचे निदान आणि उपचार करण्यासाठी अनेकांना नेहमी संकोच वाटतो. या कारणामुळे बऱ्याचदा मुळव्याधीकडे दुर्लक्ष केले जाते. जेव्हा मुळव्याधीमुळे दैनंदिन काम करणं अथवा बसणं कठीण जाऊ लागतं, तेव्हा यावर उपचार करण्याकडे भर दिला जातो. तोपर्यंत मूळव्याधीची समस्या अधिकच वाढलेली असते. यासाठी प्रत्येकाला मुळव्याधीविषयी माहीत असणे फारच गरजेचे आहे. कारण वेळेवर उपचार केल्यास मुळव्याधा पासून नक्कीच मुक्तता मिळू शकते. शल्यतंत्र विभागात मुळव्याधावर नियमितपणे संशोधन चालू असून विविध प्रकल्प शल्यचिकीत्सा विभागातर्फे नियमितपणे राबवले जातात, त्याचाच एक भाग म्हणून शल्यचिकीत्सा विभागातर्फे मूळव्याध, भगंदर, फिशर या सारख्या गुदविकारावर मोफत तपासणी आणि उपचार शिबीर आयोजन केले आहे. या शिबिरानंतर व्याधींवर आयुर्वेदिक पध्दतीने औषोधोपचार उदा. क्षारकर्म, रक्तमोक्षण




जलौका व शस्त्रकर्म चिकित्सा अत्यल्प दरात केल्या जातील. रुग्णांना पुन्हा पुन्हा मुळव्याध होऊ नये,या शिवाय पुन्हा आजार निर्माण न होण्यासाठी आदर्श जीवनशैली बद्दल तज्ञ चिकित्सकाकडून मार्गदर्शन मिळेल. शिबिरातील चिकीत्सक मुळव्याध असणाऱ्या रुग्णांनी काय काळजी घ्यावी व कोणते पथ्य पाळावे. याबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील.

मोफत नावनोंदणीसाठी क्र. ०२४०-२६४६४६४, २३७९२४८, ७९७७४८८०१८, ८६०५५२०५०८ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी तज्ञ चिकीत्सक म्हणून डॉ. बी. एन. गडवे, डॉ. आर. एन. गुंडरे, डॉ. एस. व्ही. मोरे, डॉ. पी. व्ही. बोचरे, डॉ. ए. ए. सुळकेकर, डॉ. पी. एस. घोरपडे, डॉ. पी. एन. तेलंग्रे उपलब्ध असतील.

गरजु रुग्णांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालय प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख आणि रुग्णालय अधिक्षक डॉ. नरेश निंबाळकर यांनी केले आहे.

# गाव प्रवेश बंद, पुढाऱ्यांत भीती; फिरण्याची हिंमत होईना

आधुनिक केसरी न्यूज


**खुलताबाद :** खुलताबाद तालुक्यातील तीनही महसूल मंडळ मधे पुढारी मंत्री यांना मराठा आरक्षण झाल्याशिवाय प्रवेश बंद असल्याने त्याचा पालन पुढाऱ्याकडून काटेकोरपणे होत आहे.परंतु खुलताबाद शहर व वेरुळ येथे मात्र पुढारी कार्यकर्ते सह येवुन आपले काम मार्गी लावण्यात यशस्वी ठरत आहे. तसे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दुसऱ्यांदा मराठा आरक्षण मंजुर करण्यासाठी संधी दिली.व तसे आपल्या भाषणांतून त्यानी २४डिसेंबर पर्यंत मंत्री पुढाऱ्यांना गाव प्रवेश खुला उघडा आहे. परंतु मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाची भिती जबरदस्त मंत्री पुढारी यांनी घेवून विविध विकास काम विविध उपक्रम मतदार संघात मतदार नागरिकांच्या भेटीगाठी आत्महत्या व निधन झाल्यानंतर सांत्वन भेटी विविध उत्साह एक ना अनेक कामे मंत्री पुढारी करण्यासाठीं उत्सुक असताना मात्र मराठा आरक्षण ची भिती अतिशय घर करुन गेली आहे.व पुढारी मंत्री मतदार संघात भेटीगाठी साठी फिरु शकत नाही.जेव्हांकी २४डिसेंबर पर्यंत गाव प्रवेश खुला उघडा आहे.परंतु हिम्मतच होत नाहीय त्यामुळे सर्व कार्यक्रम ठप्प पडून आहे.व २०२४ निवडणूक संदर्भात मतदार संघात काहीही करता येत नाही. व विविध पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मंत्री पुढारी यांना गावात आणण्या साठी तयार आहे परंतु एकमेकांच्या पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी भिती बाळगुन आहे. केव्ह,कोठे, कधी काय होईल याची शाश्वती नसल्याने पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी चार हात लांब व दुरुनही गमत पाहत आहे.हे विशेष.





महाराष्ट्र Business Katta









# इंसान बने रहना इतना मुश्किल है?



बबन दामोदर गुळवे
संपर्क क्र.९५४५४४२६४८.

आधुनिक केसरी

**आम्ही लहान होतो तेव्हा दूरदर्शन वर एक सामाजिक संदेश देणारी जाहिरात येत असे. रस्त्यावर कचरा टाकणारे, तंबाखू व गुटखा खाऊन रस्त्यावर थुंकणारे, विनाकारण मुक्या प्राण्यांना मारहाण करणारे वाईट व राक्षसी प्रवृत्तीचे लोक दाखवून जाहिरातीच्या शेवटी एक वाक्य ठळक अक्षरात दाखवले जायचे. ते वाक्य असे होते... सैतान बनना आसान है,पर क्या इंसान बने रहना इतना मुश्किल है?ही जाहिरात खरोखर सामाजिक संदेश देणारी होती.ही जाहिरात मला खूप आवडत असे.आजकाल दूरदर्शन वर अशी जाहिरात पहायला मिळत नाही.सामाजिक संदेश देणे तर फार दूरची गोष्ट झाली आहे.**

आजकाल बहुतेक लोक हे माणसं असूनही माणसांसारखे वागत नाहीत हे अगदी खरे आहे. खेड्यात व शहरांत रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात. नागरिक आपल्या घरातील कचरा गोळा करतात आणि तो कचरा घराबाहेर नेऊन सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर फेकतात. तेथे कचरा टाकणे व कचऱ्याचे ढीग तयार करणे ही नवीन परंपरा बनली आहे. कचऱ्याचे साचलेले ढीग पाहिले की प्रत्येक घर,बंगला व अपार्टमेंट हे कचरा तयार करणारे कारखाने झाले आहेत असे निदर्शनास येते.कचरा गोळा करणारी घंटागाडी गल्लीतून जाऊ लागली की ती लगेच कचऱ्याने खचाखच भरते.एवढा अफाट कचरा आपण तयार करतोय.म्हणजे आम्ही माणूस कमी आणि कचरा निर्माण करणारे सैतान बनलो आहोत! सध्या पिण्याच्या पाण्याची एक मोठी समस्या बनली आहे. स्वच्छ व मानवी आरोग्याला पोषक असे पाणी मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे गल्लोगल्लीत वाटर प्युरिफायर प्लांट सुरू झाले आहेत. नैसर्गिकरित्या पिण्याचे पाणी मिळणे हा मूलभूत अधिकार असूनही पाणी विकत घेऊन प्यावे लागत आहे. याचा परिणाम हा जागोजागी पिण्याच्या पाण्याच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्या टाकून दिलेल्या दिसतात. हा कचरा, प्लास्टिक पिशव्यांचा कचरा आणि दवाखान्यातून निघणारा जैविक व अजैविक कचरा पर्यावरणात विषारी वायूंचा फैलाव करत आहेत. तसेच तुंबलेली गटारे, साचलेले सांडपाणी यामुळे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होत आहेत. डासांची पैदास आणि डेंग्यू आजाराचा प्रसार वेगाने वाढत आहे.म्हणजे माणसे असूनही आपण सैतान बनून आपल्याच जीवावर उठलो आहोत! पानटपरीवर जाऊन मनपसंत सुपारी चघळणे, आवडते पान व गुटखा खाणे आणि रस्त्यावर पचापच थुंकून सार्वजनिक ठिकाणे लाल रंगाने रंगवून टाकणे ही फॅशन फार जुनी आहे परंतु आपल्या सर्वांचे आरोग्य बिघडवून टाकतेय.त्या थुंकितले भयंकर असे विषाणू आणि सिगारेट ओढणाऱ्यांच्या धुरामधले घातक विषाणू वातावरणात मिसळतात. श्वाच्छोश्वासावाटे आपल्या सर्वांच्या शरीरात प्रवेश करतात. हे फार घातक व भयंकर आहे.सिगारेट ओढणाऱ्यांना, तंबाखू व गुटखा खाण्याऱ्यांना प्रतिबंध घालण्याची किंवा अटकाव करण्याची हिंमत कोणीही दाखवत नाही!उलट संगतीचा परिणाम म्हणून की काय तंबाखू व गुटखा खाण्याऱ्यांची व सिगारेट, विडी ओढणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

जास्त प्रमाणात कचरा तयार करणे,तयार झालेला कचरा रस्त्यावर फेकणे,पाण्याचा अपव्यय करणे, व्यसनांच्या तलफीने सार्वजनिक ठिकाणे लालेलाल व घाणेरडे करणे, मुक्या प्राण्यांना विनाकारण मारहाण करणे ही राक्षसी प्रवृत्तीचे कामे आहेत. माणसे असलो तरी आपण सहजपणे सैतान बनून वाईट कामे करत आहोत आणि या प्रवृत्ती बळावत आहेत आणि म्हणून मनात हे वाक्य सतत रुंजी घालतेय-क्या इंसान बने रहना इतना मुश्किल है ?तेव्हा आपण सर्वांनी माणसाचे सैतान बनण्यापेक्षा माणूसच बनून राहू या...सगळ्या वाईट सवयींचा त्याग करू या. नाहीतर येणारा काळ आपणाला कधीच माफ करणार नाही.




# ।। दत्तात्रय योगिया ।।



पंकज वसंत पाटील
मो. 9850430579

आधुनिक केसरी

**उत्तुंग हिमालय शिखरांपासून गंगा खोरे, कच्छ मुंबईचा समुद्रकिनारा ते कन्याकुमारीला आपल्या योगबलाने मोहित करून सोडणारे महान योगी गोरक्षनाथ. आध्यात्मिक क्षेत्रात आजही गुरु गोरक्ष यांचा नाव आदराने घेतलं जाते. नाथ संप्रदायाचे आद्यप्रवर्तक विश्वगुरु श्रीगोरक्षनाथ महाराज यांना भावांजली अर्पण करताना ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, "तेणें योगाब्जिनी सरोवरू। विषयविध्वंसैकवीरू। तियें पदी कां सर्वेश्वरू। अभिषेकिला ॥" "ज्याच्या हृदय सरोवरात योगरूपी अनेक कमळे उमललेली आहेत व विषय विध्वंस करण्याविषयी ज्याचा लौकिक आहे अशा योगेश्वर गोरक्षनाथांना मच्छिंद्रनाथांनी आपल्या समाधी योगैश्वर्याचे पदावर बसवून राज्याभिषेकच केला आहे.**

दहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रात एकामागून एक उदयास आलेल्या भक्तीसंप्रदायांचे उगम नागपंथामधूनच झाले असल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. नागपंथात पूर्वीपासूनच स्त्री, शूद्र व जातीभेद दिसत नाही. नागपंथी म्हटलं की सर्वांगाला राख फासून जंगलात राहणारा व चिमटा वाजवीत, घुंगरांचा आवाज करीत 'अलख' अशी आरोळी देऊन भिक्षा मागणारा गोसावी असे चित्र नजरेसमोर येते.

"आदिनाथः शिवः सर्वेषां प्रथमो नाथः ।
नाथ संप्रदायः प्रवृत्त इति नाथसम्प्रदायिनो वदान्ति ।।"

आदिनाथ किंवा शिव हेच सर्वप्रथम नाथ असून या पंथाचे संस्थापक शिव म्हणजे प्रत्यक्ष शंकर आहेत म्हणून या पंथाला नाथ-संप्रदाय म्हणून ओळखतात. नाथ या शब्दात अशी काही जादू आहे की नाथ हा शब्द उच्चारताच त्यांच्या विषयीचे सारे गैरसमज विसरून मन तात्काळ श्रद्धाभावाने हात जोडते.

निवृत्तीनाथांनी आपल्या अभंगात गुरुपरंपरा सांगताना केलेले वर्णन असे आहे-

आदिनाथ उमा बीज प्रगटले । मच्छिंद्रा लाधले सहजस्थिति ।।
तेची प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ।।
वैराग्ये तापला सप्रेमी निवाला । ठेंवा जो लाधला शांतीसुख ।।
निर्द्वंद्व निःसंक विचारता मही । सुखानंद र्‍हदयि स्थिरावला ।।
विरक्तीचे पात्र अन्वयाचे सुख । देउनि साम्यक अनन्यता ।।
निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण । कुळ हे पावन कृष्णनामे ।।

ज्ञानेश्वरांनी गुरुपरंपरेने चालत आलेला भक्तीप्रेमाचा वारसा आदिनाथ (शिव) - मच्छिंद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तीनाथ असा सांगितली आहे. गोरक्षनाथांचे शिष्य गहिनीनाथ हे निवृत्तीनाथांचे गुरू होत. निवृत्तीनाथांची व गहिनीनाथांची भेट ब्रह्मगिरी पर्वताच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर पडली होती व तिथेच निवृत्तीनाथांना अनुग्रह झाला. निवृत्तीनाथांनी आपल्याला मिळालेला ज्ञानोपदेश ज्ञानेश्वरांना दिला व ते त्यांचे गुरू ठरले. हे गुरुगम्य रहस्य आपल्यापर्यंत कसे येऊन पोहचले, हे सांगतांना ज्ञानेश्वर पुढील अभंगात लिहतात..

आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा । मच्छिंद तयांचा मुख्य शिष्य ।।
मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनी प्रति ।।
गहिनीप्रसादें निवृत्तिदातार । ज्ञानदेवा सार चोजविलें।।

गोरक्षनाथांनी निवृत्तीनाथांना साधनेतील बारकावे तसेच गीतेचे मर्मही सांगितले. त्याचे उल्लेख काही ठिकाणी आढळतात. या भेटीचे वर्णन करताना गोरक्षांचा उल्लेख 'दत्तात्रय योगिया' असा केला आहे. ज्ञानेश्वर गाथात म्हटले आहे-

ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पंचाळेश्वरी।
ज्ञानदेवाच्या अंतरी । दत्तात्रय योगिया । पैल-मुरुच्या शिखरी ।
एक योगी निराकारी ।।

कार्तिक शुद्ध त्रयोदशी श्रीचैतन्य गोरक्षनाथ महाराज प्रकट दिन म्हणून साजरी केली जाते. गोरक्षांच्या तत्त्वज्ञानाचा विचार केला तर ते अगम्यच, यामुळे या दिव्य योग्याची जन्मकथाही चमत्कारिकच आहे. मच्छिंद्रनाथ माधुकरीसाठी गावात फिरत असता मूल होत नसलेल्या एका विप्र स्त्रीला त्यांनी सूर्यबीज अभिमंत्रून ती भस्म चिमटी दिली. त्या स्त्रीने भय वाटून, ते भस्म न खाता उकिरडयावर टाकले. त्यात जीव धारणा निर्माण झाली. उकिरड्यात देह धारण करून गोरक्ष बारा वर्षे राहिले. नंतर पुन्हा त्याच गावी मच्छिंद्रनाथ आले असता आपण भस्म दिल्याचे आठवले. ते नंतर त्या स्त्रीला शोधून काढतात, तिला खाणाखुणा विचारतात. ती स्त्री घडलेली सर्व कथा सांगते. नंतर जिथे भस्म टाकले ती जागा दाखविते. त्या गोवऱ्यांच्या ढिगाऱ्यातून मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथास बाहेर काढतात. वरील कथा श्रीनवनाथ भक्तिसार ग्रंथात आलेली आहे. मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथांना घेऊन तपाचरणासाठी बद्रिकेदारला गेले व तेथे तपासाठी बसविले. नंतर गोरक्षनाथ महाराष्ट्रात येऊन अहमदनगरहून सात-आठ मैलांवर असलेल्या डोंगरगण या स्थानी राहिले.

गोरक्षनाथ यांनी गहिनीस अनुग्रह देऊन महाराष्ट्रात एक गोरक्ष गुरुपरंपरा निर्माण केली. त्या गुरूनपरंपरेनेच महाराष्ट्रात नाथपंथ फोफावला. पैठण येथे मोठे गुरुपीठ निर्माण झाले. गोरक्षनाथांनी अशी गुरुपरंपरा अखिल देशात निर्माण केली. त्या त्या प्रदेशात गुरुपरंपरेची जोपासना व्हावी म्हणून मठ स्थापन केले.

गोरक्षनाथांचा संचार उत्तर हिंदुस्तानातील नेपाळ, काश्मीरपासून, तिबेट, पंजाब, बंगाल पासून रामेश्वरपर्यंत आणि महाराष्ट्रातही होता. म्हणूनच उत्तरभारत ते महाराष्ट्रापर्यंत त्यांची स्थाने पसरलेली आहेत. गोरखपुर येथे गोरक्षनाथांचा भव्य नाथपंथीय दिक्षा आश्रम आहे. त्यांनी सर्व भारतभर संचार करून धर्मजागृती केली. उज्जनीचा राजा भर्तृहरी हा गोरक्षनाथांचा शिष्य होता.

गुरु गोरक्षनाथांनी त्या काळी अतिशय भरीव आध्यात्मिक सामाजिक आणि सांप्रदायिक कार्य केले. अध्यात्म ज्ञानाची भाषा संस्कृत झाली असताना सर्वसाधारण समाज तत्त्वज्ञानाच्या कक्षेत न राहता अविचाराच्या साधनेतच रमू लागला होता. समाजाची प्रवृत्ती चिंतनशील न राहता तांत्रिक प्रवृत्ती निर्माण होऊन समाज आपलं आध्यात्मिक स्वास्थ गमावून बसला होता. वर्णाचाराचा व जातीयतेचा प्रभाव समाजात उग्र स्वरूप धारण करून समाजाला त्रस्त करू लागला. अशावेळी नाथ संप्रदायातील योग्यांनी हिंदू धर्माची झालेली ही दीनावस्था पाहून भागवत धर्माची प्रस्थापना केली. समाजाला शुद्धाचाराकडे लावले. शैव व शाक्त, वैष्णवी साधनाचे नूतनीकरण केले. तांत्रिक प्रकृतीला श्री गोरक्षनाथांनी विरोध करून योगमार्ग सर्वश्रुत केला. केवळ दाढी मिशा वाढवून भगवी वस्त्रे घातल्याने कोणी योगी होत नाही. गुरुपदास प्राप्तही होत नाही. तर त्याला योग्य ज्ञानसंपदा असली तरच तो गुरु ज्ञानाची संपत्ती शिष्यगणांवर उधळू शकतो, अशाच गुरूंची सेवा करा असा सल्ला गोरक्षनाथ साधकांना दिला.

अध्यात्मिक कार्यात श्री गोरक्षनाथांनी साधनेला दिलेले वळन फार महत्त्वाचे आहे. श्री गोरक्षनाथांनी भारतीय अध्यात्माला खरे खडे{लआवावावावावावावावावावा वळण दिले. योगतंत्र भक्तीच्या कक्षेत भारतीय अध्यात्म आणला व हठयोगी परंपरा चालू केली की ज्यामुळे संत वा सिद्ध हे समाजाचे आदर्श बनले. तपअस्वी साक्षात ईश्वररूप झाले. शरीराला प्राधान्य दिल्याने, श्रीगोरक्षनाथांनी साधन प्रवृत्ती ही चिंतनशील करून समाजात आरोग्य संवर्धन ही एक मोहीम सुरू केली. गोरक्षनाथांनी साधकाला योगनिष्ठ केले. साधनेतील वर्गांचे भक्त, साधक, योगी, तपी व सिद्ध या पंचकांमध्ये वर्गीकरण केले. गोरक्षनाथांच्या साधन क्रांतीने नागपंथाचे वैशिष्ट्ये भारतीय अध्यात्मात आजही असामान्य आहे. गोरक्षनाथांचे भारतीय अध्यात्मावर हे फार मोठे ऋण आहे. त्यांनी योगधर्म वाढविला व उपदेशपर ग्रंथरचना



केली. प्रकृतात आत्मबोध देऊन भारतीय अध्यात्म्याची शान वाढवली.

श्रीगोरक्षनाथांनी धर्मभेद, वर्णाचार व जातीभेद यास पंथात थारा न देता शरण येणाऱ्यास शास्त्र देऊन धर्मोपदेश करीत रावा पासून रंकापर्यंत एकच दृष्टीभाव ठेवल्याने भारतीय अध्यात्माला वेगळेपणा प्राप्त करून दिला. गोरक्षनाथांनी अध्यात्मिक साहित्याची निर्मिती केली. आत्मोन्नती ही साधनेतील गुरूनिष्ठेत-भक्तीत आहे, हे स्वतःच्या आचरणाने बिंबवून प्राधिकार योगनिष्ठ केले. श्रीगोरक्षाचे अद्वैत हा हिंदूधर्माचा योगनिष्ठ मेरूमणी आहे! गोरक्षनाथांनी समाजात धर्मजागृती ज्ञान योगाने केली. धर्मजागृतीला नैराश्याचा, वैराग्याचा आधार घेतला नाही त्यांनी धर्म वर्ण व जातीभेद न मानल्यामुळे नागपंथाचा प्रचार देशव्यापी झाला. यामुळेच देशाच्या निरनिराळ्या प्रदेशात श्रीगोरक्षांचे श्रद्धास्थान आढळते. त्यांनी धर्मसाधना, योगसाधना केल्यामुळे चिंतनशील प्रवृत्ती वाढली व समाजाला संयमी शांत प्रवृत्तीकडे नेलं. सामाजिक आचारणशुद्धतेत श्रीगोरक्षनाथांनी जास्त लक्ष घातले. स्त्री विषयक भोगमय समाजाच्या वासना नाहीशा करत स्त्री ही माता आहे हे प्रतिपादन करत समाजाला शुद्धाचरणाची शिकवण दिली.

गोरक्षनाथांचे अवनस्व, अमरौघशासनम्, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता, सिद्धसिद्धांतपद्धती, योगमार्तंड, प्रबोध या संस्कृत ग्रंथांसह सबदी, गोरखबोध इत्यादी हिंदी ग्रंथ तसेच अमरनाथ संवाद, गोरक्षकल्प, गोरक्षगीता असे मराठी ग्रंथही प्रसिद्ध आहेत. हिंदी भाषेतील पहिले कवी म्हणून गोरक्षनाथांचा संबोध केला जातो. गोरक्षनाथ ही फार मोठे सिद्ध पुरुष होते तसेच हठयोगाचे जनकत्व गोरक्षनाथांकडे जाते. त्यांनी धार्मिक तत्त्वज्ञान हिंदी,बंगाली मराठी अशा देशी भाषांमधून मांडले.

गुरु गोरक्षनाथांनी रचलेली भक्तीपर पदे, अध्यात्म, बोधविचार यातूनच पुढे भक्तीपर पदांची विपुल निर्मिती झाली. त्याचा प्रभाव संत कबीर, नानक, दादू, ज्ञानेश्वर, रामदास स्वामी, नामदेव इत्यादी संतांच्या वाणीतून उद्‌बोधनातून दिसून येतो. गुरु गोरक्षनाथांनी भक्त म्हणून दीक्षा दिलेले महाराष्ट्रातील उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरांचे पणजे त्रंबकपंत होय. नागपंथात विदर्भातील शाखेचे सुप्रसिद्ध 'विवेकसिंधू' कर्ते कवी मुकुंदराज यांनी बाराव्या शतकात लिहिलेल्या ग्रंथात वैदिक नाथपरंपरेचे दृढ नाते सदृश्य करून संसारी लोकांसाठी सगुणभक्ती सांगितली आहे.

मनाच्या एकाग्रतेशिवाय समाधी अवस्था प्राप्तच होत नाही.
ही मनातील चिंतेची धार नाहीशी करण्यासाठीच नित्य योगाभ्यासाची गरज आहे, असे गोरक्षनाथ आपल्या गोरक्षोपनिषद अमनस्कमहायोग मध्ये म्हणतात..

**' एवंविध-गुरोः शब्दात् सर्व चिंता-विवज्जिर्यतः
स्थित्वा मनो हरे देशे योगमेव समभ्यसेत ।।**

अर्थात 'एकांत प्रदेशात स्थिर सुख आसनस्थ होऊन सर्वांगाला स्थिर करून मेरुदंडाला ऋजू करून दृष्टीला स्थिर करून सर्व चिंतेला बाजूला सारून योग अभ्यास करा.'

परमेश्वर प्राप्ती ही देश, काल, धर्म, वंश, जाती या भेदांपलीकडे आहे हे गोरक्षनाथांनी आपल्या आचरणाने सिद्ध केले. त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्याचा पाया घातला. त्यांच्या शिष्य मंडळात हिंदू तसेच मुस्लिम लोकही होते. गोरक्षनाथांना स्त्रीशूद्रांच्या उद्धाराची तळमळ होती. लोकभाषांचे उन्नयन करण्यास गोरक्षनाथांनीच सुरुवात केली. हिंदीचा अखिल भारतीय पातळीवर अवलंब करणारे ते प्रथम पुरुष होय. अवधुतांच्या सानिध्यात असल्याने गोरक्षनाथांचा 'दत्तयोगी' असा गौरव ज्ञाननाथांनी केला आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रथम प्रणेते, विवेकापासून दुरावलेल्या भारतीय आचार परंपरेचे उद्धारकर्ते, स्त्रीशुद्रांचे त्राते, लोकभाषांचे पुरस्करते योगी गोरक्षनाथ यांना शत शत प्रमाण.

# दिवाळी पहाट'वर प्रशासन व सज्जनांचे मौन ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात १९९२ ते २०२३ काळात मोठा स्टँप पेपर घोटोळा झाला. या घोटाळ्यावरची कथेची वेबसिरीज चांगली गाजत आहे.या स्टँप पेपर घोटाळ्यातील प्रमुख आरोपी अब्दुल करीम तेलगी याने कर्नाटक आणि महाराष्ट्रातील राज्यातील बड्या प्रशासकीय व पोलिस अधिकारी आणि राजकीय व नेत्यांना हाताशी धरुन सुमारे तीस हजार कोटीचा घोटाळा केला.तेलगी शेवटी म्हणतो,हा घोटाळा एकट्याने केलेला नाही,तो सर्वांनी मिळून केलाअसे सांगतो.पण शेवटी तेलगीला तुरुंगात पाठविले जाते. त्याचा जेलमध्ये मृत्यू होता.पण या करोड्याच्या घोटाळ्यातील वाटकरी असलेले अधिकारी व पोलिस अधिकारी व राजकीय नेत्यांना मोकाटच राहिले आहेत! भ्रष्टाचाराची सुरुवात छोट्या प्रकरणापासून सुरूवात होते.**

नंतर तो वाढत जातो.एका गुत्तेदाराने करोडो रुपायांचा भ्रष्टाचार केला,तो झाकण्यासाठी तो समाजकार्य म्हणून देणगी व मदत करत असे !त्याने अनेकांना मोफत देवदर्शनही घडविले! मग त्याला भ्रष्टाचारी म्हणायचे का समाजसेवक? नांदेड दिवाळी पहाट चा कार्यक्रम भ्रष्टाराचा एक भाग आहे.नांदेडात नेहमी चमकोगिरी करणारे आणि तथाकथित समाजिक कार्यकत्यांनी ही'सांस्कृतिक भूक' म्हणून नांदेड प्रशासनाला हाताशी धरले व 'दिवाळी पहाट' कार्यक्रम घेण्यास भाग पाडले. यात जिल्हा प्रशासन फसलेले आहे. यावर्षी 'दिवाळी पहाट' चा कार्यक्रम निर्विध्नपणे पार पडला आहे. कार्यक्रमाचे उदघाटन प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केले व समारोप भाजपा खासदाराच्या हस्ते करण्यात आले. मी काही उपद्रवी संघटनेचा सदस्य अथवा नेता नाही, छोटासा पत्रकार आहे. त्यामुळे हा कार्यक्रम उधळून टाकणाऱ्यापैकी नाही. मी भ्रष्ट प्रशासनाच्या विरोधात कायदेशीर मार्गाने २०१७ पासून संघर्ष करत आहे.यात मला यश येईल किंवा अपयश! पण यात न्याय संस्था देईल! पण खंत याची वाटते की, नेहमी भ्रष्टाचाराच्या नैतिकच्या गप्पा मारणारे सभ्य मंडळी यात सहभागी होतात, मौन पाळतात! टाळ्या वाजवितात. हे सांस्कृतिक भूकवाले इतके चणाक्ष आहेत की, त्यांनी जिल्हा प्रशासन, पत्रकार, राजकीय नेत्यांना जाळ्यात ओढले आहे. त्यामुळे कोणी या गैरकायदेशीर कार्यक्रमावर बोलत नाहीत! जिल्हा प्रशासनाचा कारभार पारदर्शक असेल तर माहिती अधिकारात उत्तर का दिले जात नाही!या दिवाळी पहाट ची माहिती दडपविण्याचे कारण काय?या कार्यक्रमाचे नियोजन प्रशासन करत आहे.यात त्यांचा सहभाग असतो.हेच दरवर्षी चालत आहे.पण ते लपविले जात आहे.या 'पहाट'वर एक रुपया खर्च होत नाही काय? या दिवाळी पहाटचा शासकीय अधिकारी संयोजक होता.तो कंत्राटदाराकडून देणग्या व प्रायोजक म्हणून लाखो रुपये जमा करत होता.आता तो संयोजक गायब झालेला आहे. यावर्षी २०२३ पुन्हा नांदेड जिल्हा प्रशासनाने दिवाळी पहाट च्या नियोजन बैठक घेतली. पण प्रशासनाने बैठकीचे जाहीर आवाहन केले नाही. जिल्हा प्रशासनाने गुपचूपणे ठवणीतल्या लोकांना का बोलावले? प्रशासनाने दिवाळी पहाट'साठी कार्यक्रमासाठी, देणग्या, प्रायोजक घेणे बेकायदेशीर आहे. यावर्षी शहरात या कार्यक्रमाचे बँनर लावले गेले होते. याबाबत मनपाने नियम धाब्यावर बसविले, असे वृत्त एका दैनिकाने दिलेले आहे. माजी मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांचे कार्यकाळात सिमेंट परवाना प्रकरणात न्यायालयाने निकालात तेच म्हंटलेले आहे. 'दिवाळी पहाट' मध्ये तेच घडतते आहे. नांदेड प्रशासनाची दुप्पटी भूमिका घेत आहे. एकीकडे राज्य माहिती आयोगाकडे आमचा 'दिवाळी पहाट' शी सबंध नाही, अशी लेखी उत्तर देत आहे. तर दुसरीकडे प्रशासन कार्यक्रम घेत असते. हे प्रशासन सांस्कृतिक भूकवाल्यांचा



दबाबाखाली का येत आहे?.या प्रशासनाच्या मदती शिवाय कार्यक्रम घेता येवू शकत नाही काय?? अकोला येथे संगीत प्रेमींनी ट्रस्ट स्थापन करुन. ते दिवाळी पहाट कार्यक्रम घेत आहेत! राज्यात अनेक प्रातिष्ठाणच्या वतीने दिवाळी पहाट चे व सांस्कतिक कार्यक्रम घेतले जातात! मग नांदेडच्या सांस्कृतिक भूकवाल्यांना प्रशासनाच्या कुबड्याठी गरज तरी काय? 'माझा दिवाळी पहाट' विरोध मुळीच विरोध नाही. जिल्हा प्रशासनाने दिवाळी पहाट कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन बैठकीत आर्थिक तरतूद करावी. नोंदणीकृत संस्थेवर त्यासाठी निधी द्यावा! नांदेड मनपा तर अश्या कार्यक्रमासाठी संस्थेना पैसा वाटप असते. कार्यक्रम नियमाच्या चौकटीत घेतला गेला पाहिजे. त्यावर होणारा खर्च याची माहिती देणे प्रशासनाला बंधनकारक आहे. यावर किती खर्च होतो? कोण करतो? याची माहिती अधिकारात का दिली जात नाही,या आर्थिक मदतगारांचे नावे लपविण्याचे कारण काय? यात शासकीय कंत्राटदार देणगीदार आहेत काय? नांदेडातील सज्जन मंडळीना भ्रष्टाचाराची चीड नाही, ते मौन पाळतात. नांदेडचा शासकीय धान्याचा घोटाळा राज्यात गाजला! डांबर घोटाळा प्रकरण न्यायालयात गेले होते.दलित वस्ती निधीतही घोटाळा, महापालिकेतील गुंठेवारी प्रकरण, आता ताजे प्रकरण म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागात टक्केवारीतून दोन मोठे मासे कार्यकारी अभियंता अधीक्षक अभियंता जाळ्यात सापडले आहेत हे अधिकारी खुलेआम टक्केवारी घेत होते! हे नांदेड लोकप्रतिनिधी माहिती नाही, असे नाही! कारण हे कंत्राटदार हे लोकप्रतिनिच्या सार्वजनिक कार्यक्रमाला आर्थिक मदत करत असतात. कांही पत्रकारांचे 'दिवाळी अंक' या कंत्राटदार, भ्रष्ट अधिकारी व राजकीय नेत्याच्या जाहिरातीवर निघत असतो!मोठे दैनिकाचे वार्ताहरांना टार्गेट दिले जाते. यातून वृत्त मालकाची कोट्यवधीची कमाई होत असते! त्यामुळे सर्वांची तोंडे बंद आहेत. नांदेड जिल्हा हा नेत्यांचा बाल्लेकिल्ला मानला जात असेल,मग जिल्ह्यातील लोकप्रतिधी भ्रष्टाचारावर बोलत का नाहीत?त्यांची मजबूरी आहे काय ? राजकीय नेते व अधिकाऱ्यांच्या साटेलोटेशिवाय भ्रष्टाचार होऊ शकत नाही. यात आमदारांच्या विकास कामात टक्केवारी ठरलेली असते.यात आमदार सांगतील त्यांना कंत्राटे दिले जाते! हे आता लपून राहिलेले नाही. हा पैसा जनतेचा आणि फलक भ्रष्टाचारी आमदाराचा लावला जातो.हा प्रकार बंद केला पाहिजे. नांदेड प्रशासनात भ्रष्टाचार वाढत चालला आहे. नांदेड तहसील कार्यालतात दलालमार्फत गरिबांना लुटले जात आहे,याकडे कोणाचे लक्ष नाही, आता भ्रष्टाचार सवयीचा भाग होत चालला आहे. त्यात आम्हाला काय करायचे?जो भ्रष्टाचाराच्या विरुध्द बोलतो,लिहितो त्याला साथ देण्या- ऐवजी चारित्रहनन केले जाते. कांही मंडळी तर तर जाऊ द्या,कशाला भानगडीत पडता, जाऊ द्या ना, असा सल्ला देतात!मग भ्रष्टाचार आळा बसेल तरी कसा? किमान पत्रकारांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे. तेवढी अपेक्षा उरली आहे.

# ओबीसी सत्तातुरांचे लाडके का झाले ?



श्रीपाद सबनीस

आधुनिक केसरी

**खरं तर १९८० पासून मराठा आरक्षणाचा लढा जोमाने सुरु झाला, त्यानंतर मंडल कमिशन लागू झालं, पुढे जागतिकीकरण- खाजगीकरण- उदारीकरण लागू झालं, मग पुन्हा मराठा आरक्षणासाठी खत्री आयोग, गायकवाड आयोग, शिंदे आयोग, राणे समिती अशा विविध आयोग अथवा समितींच्या निकषांवर बऱ्याच काही गोष्टी घडल्या. मराठा क्रांती मोर्चे निघाले. ज्याची दखल संपूर्ण जगाने घेतली. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा याचा GR देखील आला, त्याच बरोबर EWS चे आरक्षण लागू झालं तरी देखील मराठा आरक्षणाचा तिढा अजून काही सुटत नाही.**

एव्हाना दिवाळीचे फटाके उडवून झाले तरी मराठा विरुद्ध इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजातील नेते यांच्यात आरक्षणाच्या मुद्द्यावर आरोप-प्रत्यारोपांची आतिषबाजी सुरू आहे. सत्ताधारी असो वा विरोधक त्यांची यात कोंडी झाली आहे. कोणतीही एक भूमिका घ्यावी तर अन्य समाज दुखावण्याचा धोका निर्माण झाला आहे. यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. मात्र आरोपांची धार काही कमी होत नाही. आता भरीस भर म्हणून की काय, राज्य मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची परस्परविरोधी विधाने समोर येत आली. अखेर मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करणे भाग पडले. मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावताना ओबीसी दुखावले जाणार नाहीत याची काळजी भाजप, शिवसेना, काँग्रेस, आणि राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वच राजकीय पक्ष घेत आहेत. राज्यात ओबीसींची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही. मात्र ती ४५ ते ५० टक्क्यांच्या आसपास असावी असा एक अंदाज आहे. सर्वच राजकीय पक्षांसाठी ही बाब महत्त्वाची ठरते. विशेषतः भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांत जाणीवपूर्वक ओबीसींमधील छोट्या जातींना संधी दिली. गेल्या १० वर्षांतील भाजपचे निवडणुकीतील यश बघितले तर, हाच घटक विजयात महत्त्वाचा ठरला आहे. सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणावर काँग्रेसचे वर्चस्व होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर सहकारातील प्रमुख नेते या पक्षात दाखल झाले. यात प्रामुख्याने मराठा समाज हा दोन्ही पक्षांचा आधार होता. त्या तुलनेत सुरुवातीपासून भाजप हा शहरी मध्यमवर्गीय तसेच छोटे व्यापारी यांचा पक्ष अशी प्रतिमा होती. मात्र या आधारावर निवडणुकीत मोठे यश कठीण असल्याचे पक्ष नेत्यांनी वेळीच हेरले. त्यातूनच ज्येष्ठ नेते वसंतराव भागवत यांनी 'मा-ध-व' प्रयोग केला. यात माळी, धनगर तसेच वंजारी समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न झाला. प्रा. ना. स. फरांदे, अण्णा डांगे तसेच गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्व पक्षाने पुढे आणले. नंतर गोपीनाथ मुंडे हे तर भाजपचे प्रमुख नेते झाले. याखेरीज सुधीर मुनगंटीवार यांना संघटना व सत्तेत संधी मिळाली. आताही भाजपचे प्रदेशाध्यक्षपद ओबीसी नेत्याकडे आहे. एकंदरीत त्यातून भाजपचा राज्यभर पाया विस्तारला. दोन्ही काँग्रेसच्या राजकारणाला शह देण्याची क्षमता भाजपात आली. जयकुमार गोरे यांच्यासारखे नेते काँग्रेसमधून भाजपसोबत आले. त्यांना सातारचे जिल्हाध्यक्षपद बहाल करण्यात आले होते. भाजपकडे इतर मागासवर्गीय समाजातून आलेल्या आमदारांची संख्या मोठी आहे. केंद्रीय मंत्री कपिल पाटील, भागवत कराड, राज्यातील मंत्री अतुल सावे यांना पक्षात मोठी संधी मिळाली. याखेरीज पुण्यातील हडपसरचे भाजपचे




माजी आमदार योगेश टिळेकर हे सावता परिषद या संघटनेत सक्रिय होते. भाजपमध्ये ओबीसी नेत्यांची मोठी यादी आहे. मराठा आरक्षण आंदोलनातून इतर मागासवर्गीयांच्या मतपेढीला धक्का लागण्याची भीती पक्षाला वाटणे साहजिक आहे. त्यामुळे पक्षनेतृत्व सावध आहे. काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्षपद (नाना पटोले) तसेच विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद (विजय वडेट्टीवार) हे इतर मागासवर्गीय समाजाकडे आहे. विशेष म्हणजे हे दोघेही विदर्भातील आहेत. भाजपच्या राजकारणाला शह देण्यासाठी काँग्रेसची ही खेळी आहे. भाजपने ज्या पद्धतीने देशात, विशेषतः उत्तर भारतात मतदारसंघनिहाय जातीय समीकरण साधत निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवले ते पाहता, काँग्रेसने त्याला प्रत्युत्तर देण्याचे ठरवले आहे. सुरुवातीच्या काळात प्रबळ जातींच्या आधारे काँग्रेसने राजकारण केले. मात्र सत्तेत वाटा मिळाला पाहिजे अशा विविध समाजांच्या आकांक्षा जागृत झाल्यावर काँग्रेसलाही त्या राजकारणाची दखल घेणे भाग पडले. त्यामुळे पारंपरिक राजकारणाचा बाज बदलला. राष्ट्रवादी काँग्रेस अभेद्य असताना मराठा समाजाचा पक्ष असा शिक्का बसायला नको म्हणून या पक्षाकडून ओबीसी नेतृत्वाला बळ देण्यात आले. छगन भुजबळ, धनंजय मुंडे, जितेंद्र आव्हाड असे नेते या पक्षातून पुढे आले. आता फुटीनंतर अजित पवार यांच्याबरोबर भुजबळ तसेच धनंजय मुंडे हे राज्यात मंत्री आहेत. तर सुनील तटकरे यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद आहे. भुजबळ यांनी समता परिषदेच्या माध्यमातून संघटन उभे केले. ते पक्षाला पूरक ठरले होते. शिवसेनेने तर सुरुवातीपासून ८० टक्के समाजकारण तर २० टक्के राजकारण असा नारा दिला होता. या पक्षाची ताकद सुरुवातीला मुंबई, ठाणे पट्ट्यात होती. त्यातही आगरी समाजाने शिवसेनेला अधिक बळ दिले. बाळासाहेब ठाकरे यांनी प्रस्थापितांविरोधात राजकारण करताना अनेक सामान्य कुटुंबांतील व्यक्तींना संधी दिली. त्यात आपसूक इतर मागासवर्गीय समाजातील तरुणांना लोकसभेपासून ते महापालिकेपर्यंत उमेदवारी मिळाली. त्यामुळे या समाजाचे पाठबळ शिवसेनेला मिळत गेले. दत्ताजी साळवी, लीलाधर डाके हे शिवसेनाप्रमुखांचे सुरुवातीपासूनचे सहकारी होते. पक्षातील फुटीनंतर ओबीसी समाज बरोबर राहावा यासाठी ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांचे प्रयत्न सुरू आहेत. एकूणच राज्यातील सर्वच प्रमुख पक्ष मराठा आरक्षणावरून इतर मागासवर्गीय समाज दुखावला जाणार नाही याची काळजी घेत नसतील तरच नवल!

श्रीपाद सबनीस

# शहरे गुदमरली; श्वास कोंडला

आधुनिक केसरी

मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे राज्यातील प्रमुख शहरांत रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. रविवार, सोमवार आणि मंगळवार या तिन्ही दिवशी मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेली शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी तर शालेय विद्याथ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली. न्यायालयानेही रात्री आठ ते दहा असे दोनच दिवस फटाके उडविण्यास परवानगी दिली होती मात्र या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करत मनसोक्त फटाकेबाजी केली. वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याच्या व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः मुंबई, नवी मुंबई यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. नवी मुंबई ही त्यातल्या त्यात कमी प्रदूषित शहर म्हणून गणले जात होते मात्र या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. मुंबई, पुण्याच्या तुलनेत नवी मुंबईचे प्रदूषण कमी असल्याने नवी मुंबईला स्वच्छता पुरस्कारात तिसरा पुरस्कार मिळाला पण आता नवी मुंबई हे शहरही वाईट या श्रेणीत पोहचले आहे. अर्थात याला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेले शहर अशी ओळख असलेल्या नव्या मुंबईचीही प्रदूषित शहरात गणना झाली आहे अर्थात मुंबई, नवी मुंबई हेच शहरे नाही तर पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले आहे. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा आया वर्षीही अती प्रदूषित श्रेणीत गणली गेली आहे. आपल्या राज्यासह देशात उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहाना शनिवारी संध्याकाळी पुण्या - मुंबईच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहानमुले, गरोदर महिला, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या.

श्याम ठाणेदार



# रब्बी पीक हंगामात आभाळाचा अडथळा, तुरळक थंडी सुटली

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे रब्बी पिक हंगामाचे पिकपेरा होवुन उगवणी ही व्यवस्थीत झाली परंतु थंडी सुटण्या ऐवजी सतत आभाळी वातावरणाचा परिणाम पिकांवर होत असल्याने वाढ खुंटली आहे. यंदा जेमतेम पावसाळा राहीला वेळेवर सुरु होवून वेळेवरच थांबला व ना परतीचा पाऊस ना आवकाळी पाऊस, पाऊस लांबणीवर न राहील्याने खरिप पिक हंगाम बरोबरच रब्बी पिक हंगाम ही वाया जाण्याच्या मार्गावर आहे. कारण नदी नाले ओढे तलाव कोरडे पडून असुण विहिरीना ही गतवर्षाचाच पाणी साठा शिल्लक असल्याने शेतकरी बळीराजा त्या पाण्यावरच रब्बी पिक हंगाम भरवाशावर आहे. पावसाळा वेळेवर थांबला परंतु थंडी काही सुटेना शेतकरी थंडीच्या प्रतिक्षेत आहे. सद्या रब्बी पिकांना थंडीची गरज आहे परंतु सततचे आभाळ रब्बी पिकांना अडथळा ठरत आहे.व त्यामुळे रब्बी पिकांची वाढ खुंटली आहे.रब्बी पिक हंगामातील गहु ज्वारी हरभरा मका व अन्य पिकें पेरा व उगवणी नंतर बऱ्यापैकी हिरवेगार टवटवीत फडफडताना दिसत असले तरी वाढ मात्र खुटली आहे.रब्बी पिक हंगामात थंडी हवी परंतु सद्या आभाळ अडथळा ठरत आहे. मात्र ना ना म्हणत थंडी सुटली आहे ती वाढली पाहिजे ती प्रतिक्षा शेतकऱ्यांना आहे.

# विविध मागण्यांसाठी शालेय पोषण आहार कंत्राटी कामगार संघटनेचा रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना तथा शालेय पोषण आहार योजना तथा शालेय पोषण आहार योजनेच्या कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची दखल राज्य सरकारने न घेतल्याने राज्य अध्यक्षा निता वारघडे, सचिव संतोष भगत, उपाध्यक्ष रवि मराडे, राज्य उपाध्यक्षा शालु हंबीर, मंगळु सावंत, बळवंत दळवी, संघटक बाळु गावंडा, सल्लागार हिरामण महाले, महिला संघटक रंगुताई कोकणे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल हिंदे, महिला अध्यक्षा सुलोचना जाधव, जिल्हा सचिव गणपत खंबाईत, उपाध्यक्षा योगिता वाकचौरे यांच्या नेतृत्वाखाली शालेय पोषण आहार कंत्राटी कामगारांनी इगतपुरी तालुक्यातील नाशिक मुंबई महामार्गालगत घोटी बायपास जवळ रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी जवळपास घोटी शहरात जाणारा रस्ता तीन तास बंद केला होता. यावेळी पोलीस उपअधिक्षक सुनिल भामरे यांना आंदोलकांनी निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा तथा खाजगी शाळा इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजण / प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना तथा शालेय पोषण आहार योजनेच्या कंत्राटी तत्वावर स्वयंपाकी तथा मदतनीस म्हणून काम करणारे कामगारांच्या व्यथा समजून घेऊन आमच्या मागण्या मान्य कराव्यात भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार ने राज्यामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी चे शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. त्यासाठी काम करणाऱ्या कामगार यंत्रणेला अन्न शिजवण्याचे काम करणे, तांदूळ व धान्यादी मालाची साफसफाई करणे, शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे, शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर साफसफाई करणे, स्वयंपाकगृहासह सांडलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे, भांड्याची साफसफाई करणे व जेवल्यानंतर ताटांची सफाई करणे, पिण्याचे पाणी भरणे व विद्यार्थ्यांना जेवताना पाणी पुरवणे, पूरक आहाराचे वाटप करणे, बाजारातून भाजीपाला, अत्यावश्यक किराणा साहित्य किंवा पूरक आहार आणणे, शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे, गॅस किंवा लाकूड उपलब्ध करून आहार शिजवणे आदी इतरही शाळेविषयक कामे करावीच लागतात. सदर शाळांवर खेड्यापाड्यातील तसेच शहरी भागातील महिला/पुरुष अगदीच तुटपुंज्या रक्कम रुपये २५००/- रुपये मानधनावर आणि कंत्राट तत्वावर काम करत आहेत. ही सर्व कामे आम्ही करत आहोत म्हणुन शासनामार्फत अभ्यास समिती नेमून चतुर्थ कर्मचारी म्हणून नेमणूक करावी, मानधनात वाढ करून किमान १५ हजार मासिक मानधन देण्यात यावे, शासनाच्या विचाराधीन असलेली केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली बंद करावी, शालेय पोषण आहार शिजवणे, इंधन, खाद्यतेल, मजुरी, भाजीपाला, अंडी, केळी, इत्यादी पूरक आहार प्रतिविद्यार्थी अनुदानात वाढ करावी. शालेय पोषण आहार शिजवणे, इंधन, खाद्यतेल, मजुरी, भाजीपाला, पूरक आहार बिल/ अनुदान मदतनीसांच्या खात्यावर जमा करावी, पोषण आहार शिजवताना घातपात घडल्यास किंवा अपंगत्व आल्यास वैद्यकीय खर्च व शास्वत रक्कम व सानुदान गृह अनुदान किमान ५ रुपये द्यावे, कंत्राटी पद्धत बंद करून चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून नियुक्त करावे, नियुक्त कर्मचाऱ्यांना पटसंखेच्या अटीवरून कमी न करावे,शालेय आहारात फळे तथा पौष्टिक बाबींचा समावेश करावा, थकीत मानधन त्वरित मिळावे या मागणीसह विविध मागण्या सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून रस्त्यावरच सरकारची भाऊबीज साजरी करून अनोख्या पद्धत पद्धतीने सरकारचा निषेध करत हे आंदोलन सुरू करून रास्ता रोको केला. आंदोलनासाठी पेठ, सुरगाणा, शहापूर, दिंडोरी, मुरबाड, इगतपुरी, हरसुल या तालुक्यातून अनेक कंत्राटी महिला कामगार संघटना एकत्रित येऊन हे आंदोलन केले. यावेळी पोलीस उपअधीक्षक सुनिल भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद पाटील पोलीसांचा मोठा बंदोबस्त या ठिकाणी तैनात करण्यात आला होता.





# लोणंद येथील आंदोलनास आरपीआयचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सकल धनगर समाजाचे हक्काचे एसटी प्रवर्गातील आरक्षण अंमलबजावणी साठी सकल धनगर समाज खंडाळा तालुक्याच्या वतीने गणेश केसकर हे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली खंडाळा तालुक्याच्या वतीने जाहीर पाठिंब्याचे लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी जाहीर पाठींब्याचे निवेदन देताना खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे, खंडाळा तालुका उपाध्यक्ष किसन भाऊ बोडरे, सचिव अरुण कोळेकर, सल्लागार अनिल केदारी, महिला आघाडी च्या मंगल ताई बनकर व इतर उपस्थित होते.यावेळी पवन धायगुडे यांनी धनगर आरक्षण प्रश्नी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# बाबरा महसूल मंडळात दुष्काळ जाहीर करावा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बाबरा मंडळातील १८ गावांचा दुष्काळसदृश यादीत समावेश करून सर्व शासकीय सवलतीचा लाभ बाबरा कृषी मंडळाला देण्यासाठीच्या सूचना तहसीलदार व उपस्थित सर्व शासकीय यंत्रणेला हरिभाऊ बागडे यांनी दिल्या. तसेच शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन शेतकऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा केली.

गुरुवारी आमदार हरिभाऊ बागडे यांनी बाबरा मंडळातील बाबरा, हिवरा, सोनारी, पोखरी या गावातील व मंडळातील विविध ठिकाणी पीक पाहणी केली.

या वेळी तहसीलदार कृष्णा कानगुले, गटविकास अधिकारी विनायक राठोड, कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास सिरसाट, सांडू जाधव, विकास गायकवाड, मिनाजोद्दीन शेख, रामकृष्ण मैंद, धनंजय महाजन, माधवराव काळे, प्रवीण वाघ, विश्वास चव्हाण, मनोहर काळे, हरिदास पवार, संजय पवार, अप्पाराव पवार, घनश्याम शिंदे, सुधीर सोनवणे, भाऊसाहेब पवार, शिवाजी वाघमारे, हरिकिसन दणके, अशोक पांडे, शरद दाभाडे, सतीश काळे, विठ्ठल राजपूत, विठ्ठल पाने, दगडू मोरे आदी उपस्थित होते.

# जुन्या सिविल येथे बेवारस स्थितीत मृतदेह आढळला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील रमा पती चौकसाक्री रोड येथे राहणाऱ्या शिवनाथ जगन्नाथ अहिरे



वय 70 या व्यक्तीचा मृत्यूदेह जुन्या सिविल च्या बिल्डिंगमध्ये बेवारस स्थितीमध्ये आढळून आला आहे. सदर हा मृत्यू देह निदर्शनास येताच नागरिकांनी बघण्यासाठी एकच गर्दी केली होती. गेल्या अनेक दिवसापासून जीर्ण बिल्डिंगच्या पायरीवर हा मृत्यूदेह बेवारस स्थितीत पडलेला असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. तर याकडे रुग्णप्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही काही नागरिकांकडून होत आहे. बेवारस स्थितीत आढळून येणाऱ्या मयताच्या नातेवाईकांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली आहे.



# शेतात आढळला मुंगूस खाणारा अजगर!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील सूट्रेपाड़ा येथे प्रभाकर देसले यांच्या शेतात अजगर मुंगुसाला खात आहे अशी माहिती मिळताच लोकांनी गावातील सर्पमित्र शरद सूर्यवंशी यांना सर्व हकीकत सांगितली सर्पमित्र तिथे जावून त्या मोठ्या अजगरला सुरक्षित पकडून नकाने तलवाच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले या कार्यासाठी सर्पमित्र शरद सूर्यवंशी सोबत बापू पाटिल पिंटू महाराज यांचे सहकार्य लाभले, अजगर सोडण्यासाठी प्रसिद्ध सर्पतज्ञ निर्भय साखला आणि नरेश सोनार आकाश सोनावणे मयूर गवली उपस्थित होते कुठेही सर्प किव्वा वन्य पशु पक्षी मानवी वस्तीत आढळल्यास सर्पमित्रांना संपर्क करावा, असे निर्भय साखला यांनी आवाहन केले आहे.

# नको असलेले मूल कुठेही टाकून देऊ नका : 1098 वर संपर्क साधा

## महिला व बालविकास विभागाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नको असलेली गर्भधारणा झाली आणि गर्भपातही करता आला नाही, तर मग जन्माला आलेल्या मुलाचे काय करायचे, असा विचार करून ते बेवारस ठिकाणी सोडून दिले जाते. मात्र असे न करता संबंधित जन्माला आलेल्या अर्भकांना सुरक्षित निवारा प्रशासनाकडून देण्यात येतो. त्यामुळे नको असलेले मूल टाकून देऊ नका, असे आवाहन महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे. तसेच याबाबत टोल फ्री क्रमांक 1098 वर संपर्क साधावा, असेही विभागाने म्हटले आहे.

जिल्ह्यात महिला व बालविकास विभाग, बालकल्याण समिती, किलबिल दत्तक संस्था, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन यांच्यासह पोलिस विभाग, आरोग्य विभाग अशा सर्व यंत्रणांकडून नवजात अर्भकांना सुरक्षित स्थळी ठेवण्याचे काम करण्यात येते. शहरासह जिल्ह्यात सार्वजनिक, तसेच बेवारस ठिकाणी नवजात अर्भक सापडल्याचे प्रकारही मागील काही वर्षांत घडले आहेत. अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी गुन्हेसुद्धा दाखल केले आहेत.

नको असलेले मूल जन्माला आले तर : प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे एखाद्या घटनेत मूल नको असल्यास व जन्म द्यावा लागला व त्यानंतर पालनपोषण करण्यास असमर्थ असल्यास संबंधितांनी त्याबाबतची माहिती हेल्पलाईनच्या 1098 या टोल फ्री क्रमांकावर तसेच पोलिस यंत्रणेला द्यावी. यामध्ये संबंधिताचे नाव गोपनीय ठेवले जाते.

येथे संपर्क करा :जिल्हा बाल संरक्षण कक्ष : जिल्हा स्तरावर ही यंत्रणा कार्यरत असून नवजात बालकाची माहिती मिळाल्यास योग्य पुर्नवसन होईपर्यंत बालकासोबत काम करत असते.

चाईल्ड हेल्पलाईन : 1098 या क्रमांकावर माहिती दिल्यास संबंधिताचे नाव गोपनीय ठेवले जाते. बालकल्याण समितीला माहिती देऊन पुढील कारवाही चाईल्ड हेल्पलाईन करीत असते.

बालकल्याण समिती : जिल्हा स्तरावरील बालकल्याण समितीला माहिती दिल्यास समितीच्या आदेशान्वये पुढील कारवाही करून त्या नवजात बाळाला ताब्यात घेतले जाते.

पोलिस विभाग : जिल्ह्यात जिवंत अर्भक सापडल्याचा घटनांमध्ये अज्ञात महिला, मातेविरुद्ध यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये गुन्हाही दाखल केला आहे. 'अर्भक मृत' आढळल्यास याबाबतसुद्धा गुन्हा दाखल केला जातो. बाल कल्याण समिती घेते काळजी : नको असलेले मूल जन्माला आल्यानंतर त्याला टाकून देण्याऐवजी बालकल्याण समितीकडे संपर्क साधावा. समिती सर्व अर्भकांना सुरक्षित ठेवते. महिला हेल्पलाईन ( 1091 ): बेवारस बाळ आढळल्यास महिला हेल्पलाईनलासुद्धा माहिती देता येते. हेल्पलाईनचे सदस्य पोलिसांच्या मदतीने बाळाला ताब्यात घेऊन प्रक्रिया करतात.

पोलिसांचा भरोसा सेल : प्रत्येक पोलिस ठाण्यात भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे. या सेलकडेही अशा घटना संदर्भात माहिती देता येते.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, सदस्या ज्योत्स्ना मोहितकर, अमृता वाघ, वनिता घुमे, सर्व पोलीस स्टेशन, बाल पोलिस पथक, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, किलबिल प्राथमिक बालगृह दत्तक संस्था सरचिटणीस प्रभावती मुठाळ, हेमंत कोठारे, उपाध्यक्षा वंदना खाडे, सदस्या शीतल गौरकार, चाईल्ड हेल्पलाईनचे प्रकल्प समन्वयक अभिषेक मोहूर्ले, अंगणवाडी सेविका आदी जिल्ह्यातील बालकांचे पुनर्वसन करीता महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात, असे महिला व बालविकास विभागाने कळविले आहे.

## औरंगाबाद जिल्ह्यातील विविध तालुक्यांच्या ठिकाणी झोननिहाय इज्तेमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात जिल्हा स्तरावर विविध ठिकाणी दरवर्षी प्रमाणे इज्तेमाचे आयोजन करण्यात येते. परंतु या वर्षी स्वरूप बदलण्यात आल्याचे दिसून येत आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील विविध तालुक्याच्या ठिकाणी झोननिहाय इज्तेमाचे आयोजन करण्यात आले असून औरंगाबाद शहर व परिसरात 19 ठिकाणी झोननिहाय इज्तेमाचे आयोजन केले आहे.

आता उद्या 17 नोव्हेंबर पासून सुरुवात होत आहे. प्रत्येक ठिकाणी धर्मगुरू वेगवेगळ्या सत्रात भाविकांना मार्गदर्शन करतील.

औरंगाबाद शहरातील परिसरात 250 -300 एकर जमीनीच्या जागेवर जिल्हा स्तरावर इज्तेमाचे आयोजन करण्यात येत होते. या वर्षी जिल्हा स्तरावर इज्तेमाचे आयोजन न करता जिल्ह्यातील विविध तालुक्याच्या 19 ठिकाणी झोननिहाय इज्तेमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संजोजन समिती तर्फे देण्यात आली.

आता उद्या 17 नोव्हेंबर पासून इज्तेमाला सुरूवात होत आहे. तसेच या शिवाय 84 मस्जिद ठिकाणी छोट्या इज्तेमाचे आयोजन करण्यात येत आहे. याला जोड असे म्हटले जाते तसेच 17 -27 नोव्हेंबर पर्यंत इज्तेमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक ठिकाणी इज्तेमा यशस्वी व्हावे यासाठी मौलाना व इतर भाविकांकडून दुआ केली जात आहे. पहिला इज्तेमा हर्सुल येथे 17-18 नोव्हेंबर रोजी होणार आहे. औरंगाबाद रेल्वे स्टेशन परिसरातील अफान कॉलनी 18-19 नोव्हेंबर रोजी, सोलापूर -धुळे हायवे वर देवळाई भागात 19-20 रोजी मिसरवाडी भागात 19 रोजी, वाळुज भागात 20-21 रोजी नारेगाव येथे 21- 22 रोजी बुड्डी लैन भागातील जामा मस्जिद येथे 22-23 रोजी पाचोड येथे 23-24 नोव्हेंबर रोजी,शेंदुरवादा येथे 24-25 रोजी होणार आहे. पिशोर येथे 25-26 , सिल्लोड 26-27 ,तिडका 27-28, शिवना 19-20 , फुलंब्री 21-22, कन्नड 22-23, खुलताबाद 23-24 रोजी, खंडाळा 23-24 , पिंपरी राजा 25-26 व बिडकीन भागात 26-27 नोव्हेंबर रोजी इज्तेमाचे आयोजन करण्यात आले आहेत.




## श्री महागणेश अधिष्ठान विश्वस्त न्यास तर्फे सामाजिक संस्थांना आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शुक्रवार दि.१० नोव्हेंबर रोजी हिंगणे होम कॉलनी कर्वेनगर मधील सेवा आरोग्य फाउंडेशन, ह्या वस्तीतील नागरिकांसाठी वैद्यकीय क्षेत्रात व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेमध्ये सकाळी श्री धन्वंतरी पूजनाचे कार्यक्रमानंतर " दीपावलीचे धार्मिक महत्त्व " या विषयावर न्यासाचे अध्यक्ष व सद्गुरू प.पू. श्री मोरेश्वर जोशी महाराज यांचे प्रबोधन झाले. तसेच दिवाळी भेट योजने अंतर्गत श्री महागणेश अधिष्ठान विश्वस्त न्यासतर्फे शैक्षणिक कार्यासाठी १ लाख रकमेचा निधी सेवा आरोग्य फौंडेशन ह्या संस्थेला समर्पण करण्यात आला. तसेच या संस्थेतील सेवाकार्य करणाऱ्या बंधू भगिनी वर्गाला शाल व साडीचोळी देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी इन्फोसिस चे वरिष्ठ अधिकारी अमित कुलकर्णी,रा.स्व. संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक, सेवा आरोग्य चे प्रदीप कुंटे, डॉ. सतीश जोशी, दत्ताजी वाळवेकर, डॉ. हर्षदा पाध्ये, मनोज देशमुख, ह्यांची मुख्य उपस्थिती होती.

रमा एकादशी, वसुबारस निमित्त ९ नोव्हेंबर रोजी सद्गुरू नारायण महाराज दत्त संस्थान च्या बेट केडगाव येथील गोशाळे मध्ये गोवत्स पूजन व गौ यज्ञ संपन्न झाला. संस्थेचे विश्वस्त संजय शितोळे, संजय संती, तसेच अनेक गो प्रेमी उपस्थित होते.

दत्त संस्थांच्या कार्यालयातील सेवेकरी वर्गाला दिवाळी फराळ,महिलांना साड्या देण्यात आल्या.

बुधवार दिनांक ८ रोजी वेल्हा येथील तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास संचलित वसतिगृहातील विद्यार्थांना शिधा, दिवाळी फराळ व निधी समर्पण करण्यात आला.

स्वा विनायक दामोदर सावरकर गुरुकुल तळेगाव दाभाडे येथील विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ,शिधा व देणगी रक्कम देण्यात आली. दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सिंहगड रस्त्यावरील नांदेड फाटा येथील आशिर्वाद वृध्द निवास या वृद्धाश्रम संस्थेला दिवाळीनिमित्त धान्य व निधी समर्पण करण्यात आले.

## दुर्गम आदिवासी पाड्यावर एक करंजी मोलाची

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** येथील श्री साई सहाय्य समिती व प्रभूनयन फाउंडेशन यांच्या वतीने खैरेवाडी या अतिदुर्गम आदिवासी पाड्यावर एक करंजी मोलाची हा उपक्रम अभिनव पध्दतीने राबविण्यात आला. दिवाळी सण सर्वत्र होत असतो मात्र आदिवासी पाड्यावर जाऊन त्यांच्याबरोबर तेजोमय दिवाळी साजरी करण्यात वेगळाच आनंद असतो. प्रभूनयन फाउंडेशनचे अध्यक्ष आनंद मवानी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील अतिदुर्गम भागातील खैरेवाडी येथील आदिवासी बांधवांना दिवाळी निमित्त मिठाई व कपडे वाटप करण्यात आले.

खैरेवाडी येथे श्री साई सहाय्य समिती व प्रभूनयन फाउंडेशन यांनी आदिवासी बांधवाना फराळ, कपडे, मिठाई, फटाके वाटून त्यांच्या घरासमोर दीप प्रज्वलीत करून रांगोळी काढून दिवाळी साजरी केली. या वेळी श्याम आदमाने राजू देवळेकर, नितीन चांदवडकर, सुमित बोधक, नितीन शुक्ला, भूमी चांदवडकर, नयना ठाकरे, प्रिया शुक्ला, काजल सिंग, अमन संघा, रमण संघा, रुद्र ब -हे, मयंक घाटकर आदी उपस्थित होते.



## क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचा विचार पुढे नेणे काळाची गरज : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचे व्यक्तिमत्त्व वाघानेही हेवा करावा असे होते. आज त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करताना अभिमानाने उर भरून आला आहे. पण एवढ्यावर थांबता येणार नाही. भगवान बिरसा मुंडा यांनी स्वराज्याचा संकल्प केला होता, आपल्याला हा संकल्प सुराज्याच्या दिशेने घेऊन जायचा आहे आणि त्यासाठी त्यांचा विचार पुढे नेणे ही काळाजी गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भगवान वीर बिरसा मुंडा यांच्या १२ फुटी पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. भाजपा अनुसुचित जमाती मोर्चा महानगर चंद्रपूर तसेच आदिवासी समाजातील विविध संघटनांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिरपूरचे गोंड राजे केशवशहा आत्राम, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराव भोंगळे,भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,प्रमोद कडू, अशोक तुमराम, माजी जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती ब्रिजभूषण पाझारे, भाजपा प्रदेश महिला महामंत्री अल्का आत्राम, धनराज कोवे, चंद्रकला सोयाम, नामदेव डाहुळे, आशीष देवतळे, मायाताई उईके, शितल आत्राम, शितल कुळमेथे, गंगूबाई मडावी, शुभम गेडाम, किशोर आत्राम, अरविंद मडावी, यशवंत सिडाम, विक्की मेश्राम, विजय पेंदोर आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'आज समाजा-समाजात द्वेष निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे देशापुढे जल, वायू, ध्वनी प्रदूषणाचे आव्हान आहेच, मात्र त्यासोबत विचार प्रदूषणाचेही मोठे आव्हान आहे. २१व्या शतकात तंत्रज्ञानाने आयुष्य बदलले, पण मानसिक स्वास्थ बिघडले हे खरे आव्हान आहे. त्यावर मात करायची असेल तर मी वाईट वागणार नाही, मी प्रामाणिकपणे आयुष्य जगेन, दुसऱ्याची रेष पुसणार नाही स्वतःची रेष मोठी करेन, असा संकल्प करावा लागेल. हा संकल्प करण्याची प्रेरणा बिरसा मुंडा यांच्या विचारांमधून मिळणार आहे.'कर्तृत्व दाखवायचे असेल, अन्यायाविरुद्ध एल्गार करायचा असेल तर वय आडवे येत नाही, याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे क्रांतीवीर बिरसा मुंडा आहेत, असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले. '१५ नोव्हेंबर १८७५ ला त्यांचा जन्म झाला आणि अवघे २५ वर्षांचे आयुष्य ते जगले. त्यातही त्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध युद्ध पुकारले. १९४२ ला भारत छोडो आंदोलन झाले, पण खरा एल्गार बिरसा मुंडा यांनी केला. 'अंग्रेजो अपने देश वापस जाओ हमारा देश हमारा राज' अशी गर्जना त्यांनी दिली. भारतीयांच्या मनात त्यांनी हा भाव पोहोचवला,' असे ते म्हणाले.

समाजासाठी बलिदान देण्याची भगवान बिरसा मुंडा यांची वृत्ती आदर्श असल्याचे सांगत ना. मुनगंटीवार म्हणाले, 'भगवान बिरसा मुंडा यांना शिकायचे होते. त्यांच्यात शिक्षण घेण्याची जिद्द होती. त्यावेळी जर्मन मिशनरी शाळेत त्यांना प्रवेश घ्यावा लागला. पण दुर्दैवाने या शाळेने सर्वांत मोठी अट ठेवली ती म्हणजे धर्मांतरण करण्याची. बिरसा मुंडा यांनी काही महिन्यांसाठी धर्मांतरण केलेही. पण एक दिवस शाळेतील एका शिक्षिकेने जेव्हा त्यांच्या समाजासाठी अपशब्द वापरले तेव्हा बिरसा मुंडा उठले आणि त्यांनी एल्गार केला. शाळेतून बाहेर पडताना त्यांनी जबरदस्तीने लागलेला धर्मही सोडला.

**तीच खरी आदरांजली ठरेल :** आदिवासी तरुणांना संधी दिली तर ते कधीही मागे राहणार नाहीत . त्यांच्याकडे असलेल्या नैसर्गिक देणगीचा उपयोग केला पाहिजे . त्यासाठी समाजातील तरुणांना साथ देण्याचे आवाहन ना . मुनगंटीवार यांनी आदिवासी समाजाला केले . ज्यावेळी आपण आदिवासी समाजातील इंकम टॅक्स भरणाऱ्या शंभर तरुणांचा सत्कार याच ठिकाणी करू ती खरी भगवान बिरसा मुंडा यांना आदरांजली असेल आणि तोच खरा लोकार्पण सोहळा असेल, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली . 'हजारो मंजिल का सफर हम पुरा कर सकते है एक कदम आगे चलना होगा ' या ओळींच्या माध्यमातून त्यांनी समाजाला आवाहन केले .

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# रत्नागिरी येथे १ डिसेंबर रोजी पहिले प्रगतिशील साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** प्रगतिशील लेखक संघ महाराष्ट्र राज्य आणि एस. पी. हेगशेट्ये कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स, अँड सायन्स रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाहिले प्रगतिशील साहित्य संमेलन दि. १ ते ३ डिसेंबर २०२३ या कालावधीत रत्नागिरी येथे होत असल्याची माहिती प्रगतिशील लेखक संघाचे राज्याध्यक्ष जी. के. ऐनापुरे व महासचिव राकेश वानखेडे यांनी दिली.

नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरीचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष, डॉ. भालचंद्र मुणगेकर हे संमेलनाध्यक्ष तर सुप्रसिद्ध हिंदी कवी व कथाकार कुमार अंबुज हे या संमेलनाचे उद्घाटक आहेत.



प्रगतिशील लेखक संघ ही गेल्या ९० वर्षांपासून सांस्कृतिक आणि वाङ्‌मयीन क्षेत्रात कार्यरत असणारी भारतीय पातळीवरील महत्त्वाची संस्था आहे. समाजात प्रागतिक विचारधारा व मूल्ये मध्यवर्ती ठेवून भविष्यवेधी भान जागृत करणारे प्रकल्प ही संस्था सातत्याने राबवित असते. प्रगतिशील साहित्य संमेलन हे त्या पैकी एक महत्त्वाचे आयोजन आहे. प्रागतिक विचार जाणीवपूर्वक अधोरेखीत करण्याचा प्रयत्न या संमेलनाद्वारे होणार आहे. पारंपारिक वर्चस्ववादी जाणिवेच्या साहित्याला हेतुतः छेद देण्यासाठी हे ३ दिवसांचे संमेलन रत्नागिरी येथील एस. पी. हेगशेट्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या गोपळबाबा वलंगकर साहित्य नगरी येथे दि. १,२, व ३ डिसेंबर रोजी होणार आहे.

शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वा. गोपळबाबा वलंगकर साहित्य नगरी चे उद्घाटन किरण सामंत यांच्या हस्ते, त्रंबक शंकर शेजवलकर मुख्य प्रवेशद्वाराचे उद्घाटन प्रमोद मुनघाटे यांच्या हस्ते तर माधव कोंडविलकर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांच्या हस्ते होणार आहे.

सायंकाळी ७ वा. क्रांती बांदेकर सभागृहात दीर्घांक सादर होणार आहे. रात्री ८ वा. अविनाश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कविता वाचन होणार आहे. त्यामध्ये विनायक येवले, श्रीकांत ढेरंगे, विकास ढोकणे, अविनाश उषा वसंत, चंद्रकांत बाबर, अनिल कांबळी, सरिता पवार, प्रज्ञा भोसले, सिद्धार्थ तांबे, प्रदिप कोकरे, माधुरी मरकड, प्रेषित सिद्धभट्टी, सुचिता कदम, आशिष शिंदे, वाल्मीक वाघमारे यांचा सहभाग असणार आहे.

रात्री ९ वा. कॉ. आर. बी. मोरे विचारमंचावर जयश्री बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी जिल्ह्याचे कवी संमेलन होणार आहे. शनिवार दि. २ डिसेंबर रोजी



सकाळी १० वा. कॉ. आर. बी. मोरे विचारमंचावर प्रसिद्ध हिंदी कवी व कथाकार कुमार अंबुज यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. संमेलनाध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर, स्वागताध्यक्ष अभिजित हेगशेट्ये व प्रगतिशील लेखक संघाचे राज्याध्यक्ष जी. के. ऐनापुरे आदी यावेळी विचारपिठावर उपस्थित असणार आहेत.

दुपारी २ वा. 'मराठीतील समीक्षेची सद्यस्थिती' या विषयांवर परिसंवाद होणार आहे. वंदना भागवत यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात प्रा. दिलीप चव्हाण, उदय रोटे व दत्ता घोलप हे सहभागी होणार आहेत. दुपारी ४ वा. राजकारणातील नैतिकता या विषयांवर परिसंवाद होणार असून ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात डॉ. कॉ. भालचंद्र कानगो, ना. उदय सामंत, आ. भास्कर जाधव, आ. यशोमती ठाकूर व खा. इम्तियाज जलील सहभागी होणार आहेत.

सायंकाळी ६ वा. ज्येष्ठ कवी रमेश इंगळे उत्रादकर यांच्या अध्यक्षतेखाली कविता वाचन होणार आहे. त्यात सुदाम राठोड, बालाजी सुतार, प्रवीण बांदेकर, रफिक सूरज, सुनीता झाडे, मेघना भुस्कुटे, सारिका उबाळे, दिशा पिंकी शेख, महेश लोंढे, वर्जेश सोलंकी, इग्नेशियस डायस, अनिल साबळे, प्रमोद अहिरे, सत्यपाल सिंग राजपूत, अनिल कांबळी हे सहभागी होणार आहेत. रात्री ९ वा. प्रेम जलसा होणार आहे. रविवार दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. क्रांती बांदेकर सभागृहात :सुंदर माझी शाळा' हा बाल कवितेचा सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. सकाळी ११:३० वा. कुमार गटासाठी 'काय वाचावं' हे चर्चासत्र होणार आहे. रेणू गावस्कर व फारुक काझी मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी १०:३० वा. 'कॉ. शरद पाटील समजून घेताना' या विषयांवर परिसंवाद होणार असून उमेश बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात वंदना



सोनाळकर, सचिन गरुड, राहुल कोसंबी हे सहभागी होणार आहेत. दुपारी १ वा. किशोर बेडकिहाळ यांच्या अध्यक्षतेखाली 'मुस्लिमांचे बहिष्करणः भारतीय लोकशाही आणि घटनेसमोरील आव्हाने' या विषयावरील चर्चा सत्रात सरफराज अहमद, चैत्रा रेडकर, ॲड. अभय टाकसाळ हे सहभागी होणार आहेत. दुपारी ३ वा. सुरेखा दळवी यांच्या अध्यक्षतेखाली 'कोकणचे पर्यावरण : साहित्य आणि संघर्ष' या विषयावर होणाऱ्या चर्चा सत्रात संपत देसाई, विवेक कुडू, सत्यजित चव्हाण हे सहभागी होणार आहेत.

सायंकाळी ४ वा. निरा अडारकर व ॲड. कॉ. सुभाष लांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या संमेलनाचा समारोप होणार आहे. या साहित्य संमेलनास राज्यभरातील प्रगतिशील लेखक संघाचे सर्व पदाधिकारी, साहित्यिक, कवी, लेखक, व साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्याध्यक्ष येशू पाटील, उपाध्यक्ष डॉ. महेंद्र कदम, डॉ. श्रीधर पवार, डॉ. समाधान इंगळे, कार्यवाह प्रा. प्रसेनजित तेलंग, व प्रा. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले आहे.



# डॉ. बछिरे यांची पालावर भाऊबीज

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** येथील वैदू, बहुरूपी यांच्या झोपड्या (पालावर) महिला भगिनींनी डॉ.गोपाल बछिरे जिल्हा संघटक शिवसेना उबाठा यांना ओवाळून, औक्षण करून भाऊबीज साजरी करण्यात आली. लोणार मेहकर रोडवर वैदू व बहुरूपी समाजाचे शेकडो पाल (झोपड्या) आहेत. अनेक जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणचे लोक हे एकत्र येऊन त्यांनी लोणार, शारा परिसरात झोपडीची वस्ती वसवली आहे. वैदू, बहुरूपी काबाडकष्ट करून आपले उदरनिर्वाह करतात विना विजेचे विना घराचे हे लोक झोपडी करून राहतात. या वैदू बहुरूपींच्या झोपडी परिसरात भाऊबीज ओवळणीसाठी डॉ.गोपाल बछिरे यांना निमंत्रित केले होते.तेथील महिला भगिनींनी डॉ.बछिरे यंना ओवाळून त्यांचे औक्षण करण्यात आले. त्या महिला भगिनींना एका भावाचे उत्तरदायित्व म्हणून साड्यांचे वाटप करून लहान बाल गोपलांना मिठाईचे वाटप करण्यात आले. वैदू ,बहुरूपी माता भगिनींसोबत भाऊबीज साजरी करून झोपडीत राहणारे हे सुद्धा आपलेच बहीण भाऊ आहेत आपल्या सुखा दुःखाचे क्षण त्यांच्यासोबतही व्यतीत करून एक आगळावेगळा संदेश समाजास देण्यात आला याप्रसंगी तालुका प्रमुख ॲड. दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव सर, श्याम राऊत, तानाजी मापारी, गोपाल मापारी, लूकमान कुरेशी, एकबाल कुरेशी, सय्यद उमर, किशोर बछिरे, अनिल पसरटे, अजय बछिरे यांच्या सह मोठ्या संख्येने वैदू बहुरूपी बांधव उपस्थित होते.

# सर्वांनी अशीच एकजूट दाखवा : जरांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मराठा आरक्षण प्रश्नी मनोज जरांगे पाटील यांचा तिसऱ्या टप्प्यातील राज्यभर दौरा सुरू झालेला असून त्यांच्या सभा सातारा जिल्ह्यात होणार आहेत.याच पार्श्वभूमीवर त्यांचे पुणे जिल्ह्यातून सातारा जिल्ह्यात सायंकाळच्या दरम्यान आगमन झाल्यानंतर त्यांचे लोणंद, ता.खंडाळा येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी त्यांनी सकल मराठा समाजाच्या बांधवांशी संवाद साधला.सर्वांनी अशीच एकजूट दाखवा.

आपल्याला आरक्षण नक्कीच मिळेल.असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.यावेळी लोणंद येथील मराठा समाज मंडळ तसेच पंचक्रोशीतून आलेल्या सकल मराठा समाज बांधवांनी मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत फुलांची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीने करण्यात आले.

मराठा समाज बांधवांच्या एकजुटी बद्दल त्यांनी विशेष कौतुक करत धन्यवाद दिले.लोणंद येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकात आले असता त्यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकास अभिवादन केले.यावेळी डॉ. नितीन सावंत, डॉ.अनिलराजे निंबाळकर,

नगरसेविका तृप्ती घाडगे, सुनील यादव, राहुल घाडगे, संतोष सस्ते,शुभम दरेकर, मयूर निंबाळकर,हेमंत निंबाळकर दादा इंदलकर , शंभुराज भोसले,हेमंत पवार,मनीष इंगळे,तानाजी भाटे कन्हैया नलवडे,अविनाश नलवडे,श्रीकांत सावंत,दत्ता भोईटे, विशाल जाधव,नितीन शिंदे तसेच पंचक्रोशीतील आलेले सर्व मराठा बांधव उपस्थित होते.एक मराठा लाख मराठा असा जयघोष करण्यात आला.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर